# माणूस

चित्रवार्ता
पुस्तक पुरवणीसह

शनिवार
१४ जून १९७५
एक रूपया

## आमच्याच आयुष्यासंबंधी

आमच्याच आयुष्यासंबंधी
आम्ही;
आता काय बोलावं ?
वठलेल्या झाडांना
पालवी फुटत नाही असं नाही
पण
तुटलेल्या झाडांचं काय ?

पंख जरवडलेल्या पारवरांनी
कुणासाठी गायची असतात गाणी ?
उखडलेल्या स्वप्नांची वरात
मिटल्या डोळ्यांपुढून
तुटल्या ताऱ्यांप्रमाणे सरकत जाते . . .
अन् उरामधले आभाळ
भर काळोखात कधी आक्रोश करून उठते.

किती संभाळावं स्वत:ला ?
एखादे वेळी
गेलाच जर का आमचा तोल
तर कुणी अन् काय म्हणून आम्हाला
लावावा बोल.

बंड पुकारून उठतं बेबंद मन
वाटतं,
हातातल्या रक्तशीत हत्याराने
बेधडक मुडदे पाडीत जावं.
अन् एकदां तरी हे आयुष्य
जिवंत
वावटळीप्रमाणे जगावं . . .

— मधुश्री



# साप्ताहिक माणूस

| संपादक | साहाय्यक | शनिवार | वर्ष : पंधरावे |
|---|---|---|---|
| श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर | १४ जून | अंक : दुसरा |
| | सौ. निर्मला पुरंदरे | १९७५ | किंमत : एक रुपया |


गुजराथेतून । चंद्रशेखर

# येथील यूथ पॉवर मनातून अत्यंत असंतुष्ट आहे

जी निवडणूक व्हावी व जी निवडणूक होऊ नये म्हणून अनुक्रमे मोरारजी व इंदिरा गांधी यांनी आटापीटा केला ती एकदाची पार पडली. निवडणुकीच्या निकालाचे चर्वितचर्वण अजून काही काळ होईल. त्या अनुरोधाने सप्टेंबरमधील केरळ निवडणूक व फेब्रुवारीमधील लोकसभा निवडणूक यांचे अंदाज बांधले जातील. गुजरातमधील निवडणुकांना जेवढे महत्त्व सर्वच राजकारणी नेत्यांनी दिले तेवढे ते खरेच आहे की नाही ते येत्या काही महिन्यांत दिसेल. या निमित्ताने राजकीय क्षेत्रात जे काही चित्र दिसते त्याचे काही विशेष नोंदविण्यास हरकत नाही. हे विशेष जरासे अस्वस्थकारक असे आहेत.

निवडणुकीकडे सामान्य माणूस खूपच उदासीनतेने बघत आहे. या साऱ्या बनावातून आपली स्थिती खरोखरच सुधारेल असे सरकार येईल असा त्याला विश्वास वाटत नाही. क्रिकेटची मॅच चालू असताना जसे सर्व लोक क्रिकेटमध्ये वरवरचा इंटरेस्ट घेतात तसाच प्रकार निवडणुकांबाबत दिसून येतो. एक लक्ष वेधून घेणारी तात्कालिक घटना यापलीकडे निवडणुकीस काही महत्त्व वा अर्थ उरलेला नाही. पुढारी सांगत आहेत ते सर्व खोटे आहे, तात्पुरते आहे, ऐकणे भाग आहे म्हणून ऐकायचे एवढेच, अशी भावना आहे. सरकार जन्माला घालणारी एक प्रक्रिया म्हणून निवडणुकीचे जे गांभीर्य आहे ते कोणास जाणवत नाही. सामान्य माणसास राजकीय नेत्यांबद्दल पराकाष्ठेची तुच्छता, चीड, अविश्वास यापलीकडे काही वाटू शकत नाही. हॉटेल्स, सार्वजनिक जागा, थिएटर्स, सभा या ठिकाणी होणारी संभाषणे व कामेंटस यावरून 'नेता' या व्यक्तीचे किती अवमूलन झाले आहे याची कल्पना येते. सिनेमाच्या आधी दाखविण्यात येणाऱ्या प्रचारपटात वा वृत्तपटात इंदिरा गांधींचे दर्शन झाले की सबंध थिएटरमधून उपहासाचे आवाज निघतात. हुर्यो होते. 'काही सराईत बदमाश' या दृष्टीने सर्वसाधारण माणूस बहुतेक राजकीय नेत्यांकडे पाहू लागला आहे. यात बदल करावा असे काही त्याला आढळत नाही.

आपण जे लोकांना सांगतो ते सर्व खोटे आहे (व ते लोक ओळखून आहेत) हे सर्वच बाजूच्या नेत्यांना मनोमन मान्य आहे. त्यामुळे त्यांचा रोख सर्व प्रचार-मोहिमेमध्ये दिलगिरीचा (अॅपॉलॉजिटिक) असा दिसून आला. 'दुसरे फार वाईट आहेत, त्याहून आम्ही बरे' असे निगेटिव्ह सूत्र सर्वच प्रचारामध्ये दिसून आले. कोणाच्याच प्रचारात काही नवीन भूमिका, तत्त्वज्ञान वा काही भरीव आशावाद यांचे दर्शन झाले नाही. आपणापुढील प्रश्न सोडविण्याची काही निश्चित रूपरेषा कोणीही लोकांसमोर मांडू शकले नाही. 'सरळ सरळ दुसऱ्याला शिवीगाळ' केली गेली.

गुजरातमधील प्रचारमोहिमेतून एक गोष्ट जाणवते ती म्हणजे राज्य-नेतृत्वास लागलेले खग्रास ग्रहण. कोणत्याही पक्षाच्या राज्यपातळीवरील नेतृत्वाने स्वतंत्रपणे प्रचार मोहीम केली नाही. सर्वच पक्षांना राष्ट्रीय-पातळीवरील नेत्यांच्या आधारेच प्रचारसभा घ्याव्या लागल्या. इंदिरा गांधी, वाजपेयी, मधु लिमये, फर्नांडीस, मोरारजी यांनाच प्रचाराचा मोठा भाग हाती घ्यावा लागला. गुजरातमधील राज्यपातळीवरचे नेते अद्याप जनतेला किती घाबरतात, जनतेसमोर येण्याची त्यांची छाती नाही याचे आश्चर्य वाटतं. काही ठिकाणी उमेदवारांना जनतेपासून 'वाचविण्या'साठी, त्यांच्याच मतदार-संघात, पोलिसांना हस्तक्षेप करावा लागला. जनतेचा प्रक्षोभ पूर्णपणे परिचयाचा असल्याने काही ठिकाणी उमेदवारांना त्यांच्या इच्छेविरुद्ध, जबरदस्तीने घोड्यावर बसविल्याची उदाहरणे घडली. राज्यपातळीवरील नेतृत्वाचा ऱ्हास ही प्रक्रिया गुजरातपुरतीच मर्यादित आहे की इतरत्रही आहे याचा खुलासा यापुढील निवडणुकांमध्ये होईल. येथे तरी दोन चार राष्ट्रीय पुढारी दिवसाला १५-१५ २०-२० प्रचारसभांत भाषणे करीत धावपळ करीत असल्याचे दृश्य दिसले. याबाबतीत इंदिरा गांधींनी अर्थातच रेकॉर्ड-ब्रेक कामगिरी केली. त्यांच्या दौऱ्याचा तपशील वाचूनच डोके चक्रावून जात असे.

कॉंग्रेस पक्षाने आपला सर्व प्रचार ग्रामीण भागातच केंद्रित केला होता. शहरी भागाकडे

जवळजवळ दुर्लक्षच केले. याउलट जनता आघाडीने शहरात आपले अस्तित्व जाणवून दिले. जे. पीं. ची एक सभा बरीच यशस्वी झाली. त्यांनी इंदिरा गांधींना, त्यांच्याच पातळीवर जाऊन बरेचसे आक्रमक प्रत्युत्तर दिले. विरोधी पक्षांनी एक पक्ष स्थापन करावा, युवकांनी निवडणूकप्रचारावर अंकुश ठेवावा, नवनिर्माण आंदोलन फुकट जाऊ द्यावयाचे नसेल तर काँग्रेसला घरी बसवा असे जे. पी. यांनी निस्संदिग्ध भाषेत सांगितले. त्यांचा येथे फार प्रभाव दिसतो.

चोरांच्या टोळीत फाटाफूट झाली की खऱ्या गोष्टी बाहेर येऊ लागतात याचे गमतीदार प्रत्यंतर या वेळच्या प्रचारामध्ये आले. चिमणभाई पटेल, अशोक मेहता, मोरारजी देसाई यांनी एके काळी सरकारात महत्त्वाच्या जागा भूषविल्या होत्या. त्या वेळी त्यांना झालेल्या माहितीचा त्यांनी प्रचारात पुरेपूर उपयोग करून घेतला व इंदिरा गांधींवर सरबत्ती केली. कोणत्या योजना इंदिरा गांधींनी कशा फेटाळून लावल्या, कोणते निर्णय कोणत्या कारणान्वये घेतले याविषयी अगदी अंतस्थ गुपिते लोकांपुढे आल्याने इंदिरा गांधींची थोडी पंचाईत झाली.

सरकारमध्ये एक काळ असणाऱ्या व्यक्तींनी, आपल्याजवळच्या माहितीचा प्रचारात उपयोग करण्याची नवीच प्रथा पडणार असे दिसते. हे तंत्र काँग्रेसफुटीनंतर १९७१ व १९७२ या निवडणुकीत कसे वापरले गेले नाही याचे आता आश्चर्य वाटते. त्या वेळी निवडणुकांमधील चुरस वेगळ्या स्वरुपाची होती व आता निवडणुकांना लढाईचे स्वरूप आले आहे असे म्हणता येईल. इंदिरा गांधींच्या एकछत्री सत्तेमुळे विरोधक आता अगदी डेस्परेट झाले आहेत व आपल्या सर्व शक्तींनिशी ते इंदिरा गांधीवर तुटून पडत आहेत असे वाटते. इंदिरा गांधींना प्रचाराचे हे नवे स्वरूप यापुढे जड जाईल.

संस्था काँग्रेस हा पक्ष, पक्ष म्हणून फार काळ राहू शकणार नाही याची खूण या निवडणुकीत पटते. संस्था काँग्रेसचे राज्याबाहेरील पुढारी–निजलिंगप्पा, वीरेंद्र पाटील, स. का. पाटील वगैरे या निवडणुकीपासून पूर्णपणे अलिप्त राहिले. मोरारजींनी आपली लढाई स्वतः लढावी असाच त्यांचा पवित्रा दिसला. एका अर्थाने ही निवडणूक म्हणजे इंदिरा गांधी विरुद्ध मोरारजी अशीच लढत होती. इंदिरा गांधींनी प्रचारात एवढे लक्ष घातले त्याचे कारण हेच. हितेंद्र देसाई यांची या निवडणुकीतील अलिप्त भूमिका, निवडणुकीनंतरच्या काळात बरीच अर्थपूर्ण ठरेल असे वाटते.

काँग्रेसच्या बाजूने प्रचारात ज्यांची गैरहजेरी प्रकर्षाने जाणवली ते नेते म्हणजे यशवंतराव चव्हाण व जगजीवनराम होत. जगजीवगराम एकदा आले पण डोक्याला दगड लागून परत दिल्लीला गेले. चव्हाण ३ जूनपर्यंत गुजराथमध्ये फिरकले नव्हते. याबाबत नक्की काही बोलणे आताच कठीण असले तरी या दोन नेत्यांचे व इंदिरा गांधींचे संबंध बरेच बिघडले आहेत यात शंका नाही. गुजरात निवडणूक तुम्हीच तुमच्या बळावर जिंकून दाखवा असा जणू गुप्त ठराव चव्हाण व जगजीवन यांनी केला होता. इंदिरा गांधींची गुजरात निवडणुकीतील आक्रमक प्रचारमोहीम ही विरोधकांविरुद्ध जशी आहे त्याप्रमाणेच ती पक्षातील मुखंडांना आपले सामर्थ्य दाखवून देण्यासाठीही आहे. याचे पडसाद लवकरच उमटतील. इंदिरा गांधींच्या नव्या प्रभावळीबद्दल (डी. के. बरुआ, सिद्धार्थ शंकर रे, नंदिनी सत्पथी वगैरे) चव्हाण जगजीवनराम यांचे मनात चांगलीच अढी आहे. बरुआ यांचे वाढते महत्त्व विशेषतः या दोघांच्या दृष्टीने धोकादायक आहे. त्यांना पक्षाध्यक्षपदावरून हटवण्याची युक्ती म्हणून इंदिरा गांधींनी स्वतःच पक्षअध्यक्ष व्हावे अशी सूचना बिहारमधील बारा प्रमुख काँग्रेसनेत्यांनी नुकतीच केली हा काही योगायोग नव्हे. हे प्रकरण यथावकाश योग्य ते महत्त्व धारण करील असे वाटते.

गुजरातमध्ये निर्णायक बहुमत मिळाले नाही तर इंदिरा गांधींच्या पक्षांतर्गत स्थानावर त्याचा निश्चित परिणाम होईल या विचारानेच त्या अस्वस्थ आहेत. एक हातचा राखून ठेवावा म्हणून त्यांनी राजकोट येथील पत्रकार परिषदेत, निवडून येणाऱ्या सर्वांना एक खुली ऑफर दिली. काँग्रेसचा कार्यक्रम व धोरणे यांस मान्यता असणाऱ्या सर्व आमदारांचे काँग्रेस स्वागतच करील असे त्यांनी जाहीर केले. पक्षबदलात असे जाहीर उत्तेजन देण्याचा त्यांचा प्रयत्न पाहून विरोधकांच्या गोटात खळबळ उडाली आहे. काही करून गुजरातमध्ये सत्ता हस्तगत करायची असा इंदिरा गांधींनी चंग बांधला आहे. गेल्या काही आठवड्यांमध्ये गुजरातमधील जनतेस सरकारने बऱ्याच सवलती देऊ केल्या. कार्डावरील रॉकेलचा दरडोई कोटा वाढवला, धान्याची लेव्हीवसुली शिथिल केली, काही कारखाने व प्रकल्प मंजूर केले. इतर राज्यांतून धान्याचा ओघ गुजरातकडे वळवला. स्वस्त धान्य योजनेखालील गव्हाचे प्रमाण वाढवले. झंझावाती प्रचार, पक्षबदलास उत्तेजन व काही निवडणूक-पूर्व आकर्षक सवलती या तीन गोष्टींवर इंदिरा गांधींची निवडणूक-मोहीम उभी होती गुरुवार ५ जूनपर्यंत, म्हणजे निवडणुकीपूर्वी दोन दिवसपर्यंत इंदिरा गांधी गुजरातमध्ये प्रचार करीत होत्या.

'आम्ही कालांतराने एक पक्ष स्थापन करू' व 'स्वच्छ कारभार देऊ' यापलीकडे जनता आघाडीस मतदारांना विशेष काही सांगता आले नाही. त्यांच्या मोहिमेत तात्पुरतेपणा, मोघमपणा व अनिश्चित भूमिका या उणीवा होत्या निवडणुकीपूर्वी सलग १५ दिवस जर जे. पीं. नी गुजरातचा दौरा करून ठोस भाषेत काँग्रेसविरोधी प्रचार केला असता तर निवडणुकींवर त्याचा निश्चित प्रभाव पडला असता; पण जे. पी. फार विसंवादी, धीमी व संदिग्ध हालचाल करतात. राजकारणाच्या सध्याच्या वेगास ते पुरे पडत नाहीत.

येथील निवडणुकीमध्ये बरेच महत्त्वाचे स्थान मिळण्याची युवक कार्यकर्त्यांची इच्छा होती. पण युवक–चळवळीचा भस्मासूर आपल्याला परवडणार नाही हे ओळखून सर्वच पक्षांनी नवनिर्माण व युवक चळवळ यांना दोन हात दूरच ठेवले. त्यांचा जो प्रभाव जाणवला तो केवळ अप्रत्यक्ष! सर्व पक्षांना त्यांची धास्ती वाटत होती एवढेच. आपल्याला सर्व व्यवहारातून वगळले याबद्दल येथील यूथ पॉवर मनातून अत्यंत असंतुष्ट आहे निवडणुकीतून जे कोणते सरकार येईल त्याला या असंतोषाला तोंड द्यावे लागेल. तीच त्या सरकारची पहिली परीक्षा राहील. □



# शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांची मुलाखत

**दि. वि. गोखले**

श्री. बाबासाहेब पुरंदरे. शिवभक्तीने ओथंबलेला एक अजब माणूस. नखरेल व नाटयमय भाषेचे देणे लाभलेले असूनही सत्याशी इमान राखणारा इतिहासकार. गेली २२ वर्षे या माणसाने महाराष्ट्राचा कानाकोपरा पालथा घातला नि हजारो व्याख्यानांद्वारे कोटयवधी मराठी जनतेपर्यंत शिवछत्रपतींचा संदेश नेऊन भिडविला. पण एवढयावर तो संतुष्ट राहिला नाही. किल्ले प्रतापगडावर एक अति भव्य व उभ्या भारतात अभूतपूर्व असे शिवस्मारक उभारण्याचे स्वप्न या शिवशाहिराला पडले व ते साकार करण्यासाठी त्याने ८–१० लक्ष रु. जमविले—श्रोत्यांना भुरळ पाडणाऱ्या आपल्या केवळ वाणीच्या सामर्थ्यावर. अद्ययावत वा परंपरागत कोणत्याही प्रकारची बुवाबाजी, जादूटोणा, गंडेताईत न करता असा चमत्कार घडवून आणल्याचे दुसरे उदाहरण महाराष्ट्रात नाही. गेल्या वर्षी मुंबईच्या शिवतीर्थावर शिवसृष्टी उभी राहिली होती. असं भव्य, देखणं नि कल्पनाचतुर प्रदर्शन भरविताना सरकारसारख्या सर्वशक्तिशाली संस्थेच्या तोंडालाही फेस आला असता. पण ते कार्य या एका माणसाने स्वकर्तृत्वावर घडविले. पुरंदरे हा माणूस अजब खराच.

पण सौ. शालिनीबाई पाटील यांच्या 'राजमाता जिजाबाई इस्पितळ' योजनेशी बाबासाहेबांचा संबंध आला आणि ते प्रखर टीकेचा विषय बनले. सार्वजनिक कार्यकर्ता, मग तो कोणत्याही क्षेत्रातला असो, शंभर टक्के लोकांना प्रिय कसा होऊ शकेल ? काही मंडळी अधूनमधून वाग्बाण सोडतच राहणार. पण एखाद्या बेसावध व्यक्तीवर अचानक जमावाने हल्ला करावा, तसा या वेळी बाबासाहेबांवर हल्ला झाल्यासारखे भासले. मी नुकताच त्यांना भेटायला गेलो होतो तेव्हा ते विषण्ण दिसले. म्हणाले : मला या संपादकमंडळींनी आधी विचारलं का नाही ? माझी भूमिका समजावून घेतली का नाही ?

: वृत्तपत्रांचं काम अशा पद्धतीनं चालत नसतं. टीका करण्याआधी प्रत्येकाला भेटून त्याची भूमिका समजावून घ्यायचं म्हटलं तर वृत्तपत्रांना काहीही लिहिणं अशक्य होईल. आपला धंदाच त्यांना बंद करावा लागेल.·मी माझा अनुभव सांगितला.

: पण मला या टीकेत आकस दिसतो. मुद्दाम खोटयानाटया गोष्टी माझ्या माथी मारण्यात आल्या आहेत. राईचा अक्षरशः पर्वत करण्यात आला आहे—पुरंदऱ्यांचे विषादपूर्ण उद्गार.

: एखादं वृत्तपत्र पूर्वीपासूनच तुमच्याविरुद्ध राग बाळगून असेल हे शक्य आहे; पण सर्वच पत्रांबाबत असं म्हणता येणार नाही. 'महाराष्ट्र टाइम्स'बद्दल बोलायचं तर तळवलकरांचा तुमच्याविरुद्ध आकस आहे, असं मला वाटत नाही. गेल्याच वर्षी आपणास इचलकरंजीच्या 'एफ. आय. ई. प्रतिष्ठान'चं मोठं पारितोषिक मिळालं. त्या निवड समितीचे तळवलकर एक सदस्य होते—मी माहिती पुरविली.

: मग एवढा गदारोळ कशामुळे ?—बाबासाहेबांचा खिन्न सवाल.

: याचं श्रेय शालिनीबाईंना ! त्यांच्या इस्पितळाच्या उपक्रमात तुम्ही सामील झालात; पैसा गोळा करण्यासाठी त्या आपल्या राजकीय स्थानाचा दबाव आणीत असूनही, तुम्ही त्यांच्याशी सहकार्य करीत आहात, एवढेच नव्हे तर शिवस्मारकनिधी-

मधून ठेव म्हणून का असेना, ५ लक्ष रुपयांची देणगी जाहीर झाली आहे; यामुळे लोक वैतागले व त्यांनी आपला संताप व्यक्त केला. –माझे भाष्य.

: पण मला त्यांनी विचारलं असतं तर मी सर्व गोष्टी स्पष्ट केल्या असत्या. –पुरंदरे.

: बाबासाहेब, पण अद्यापही आपण एखादे सविस्तर पत्रक काढून वा प्रेस कॉन्फरन्स घेऊन, स्वतःची भूमिका स्पष्ट केलेली नाही. शिवस्मारक प्रतिष्ठाननेही या देणगीचे प्रयोजन काय, हे जनतेला सांगितलेले नाही. तुमच्या या मौनामुळे गैरसमज वाढले, असं नाही तुम्हाला वाटत ? –माझा प्रश्न.

बाबासाहेब मिनिटभर सचिंत मुद्रेने स्तब्ध राहतात.

: अजूनही तुम्ही खुलासा करू शकाल, आपली भूमिका स्पष्ट करू शकाल. तुमच्यावर टीका होत असली–आणि कोणत्या सार्वजनिक कार्यकर्त्यावर ती होत नाही ?–तरी आपल्याबद्दल ममत्व वाटणारे लोकही हजारोंच्या संख्येने आहेत. तुमच्या मौनामुळे तेही संभ्रमात पडले आहेत.–पुरंदऱ्यांच्या स्तब्धतेचा फायदा घेऊन मी सांगत राहतो.

: बराय, ठीक आहे. विचारा तुमच्या शंका.–पुरंदरे उद्गारतात.

: पहिला प्रश्न अर्थातच हा की तुम्ही शालिनीबाईंच्या दिंडीत सामील कसे काय झालात ?

: हे पहा, अग्रलेखाच्या भाषेत प्रश्न नका विचारू.

: ठीक; शालिनीबाईंशी सहकार्य करण्याचा निर्णय तुम्ही का घेतलात ?

: गेल्या वर्षी मुंबईला आम्ही शिवसृष्टी उभारली होती, आपण जाणताच. या प्रदर्शनाला अनेकांनी मोलाची मदत केली. बाळासाहेब ठाकरे यांनी केली, त्याचप्रमाणे महाराष्ट्र शासनानेही केली. तेव्हाचे मुख्य मंत्री वसंतराव नाईक यांच्यापासून अनेक मंत्री प्रदर्शनाची आस्थेने चौकशी करीत. काय हवे, काय नको विचारीत. वसंतदादा व सौ. शालिनीबाई पाटील दोघेही अनेकदा येऊन गेले. आम्हाला विचारून जे जे साह्य करणे शक्य होते ते ते त्यांनी केले.

या प्रदर्शनाच्या निमित्तानेच माझा शालिनीबाईंशी प्रथम परिचय झाला. पुढे १७ जूनला (१९७४) त्यांनी सांगली येथे जिजामाता पुण्यतिथीचा एक कार्यक्रम आखला होता. आपण सांगलीला भाषणासाठी याल काय असं त्यांनी मला विचारलं. १६ जूनला मी साताराला, राजघराण्यातील भवानी तरवार पोचविण्यासाठी जाणार होतो. तेव्हा, सांगलीचं निमंत्रण मी स्वीकारले. तेथे महिलांच्या सभेत मी बोललो. जिजाऊंचे जीवन हा माझ्या भाषणाचा विषय होता. या भाषणात मी शालिनीबाईंचा उल्लेखही केला नाही, मग त्यांची जिजाबाईंशी तुलना करण्याचा भागच सोडा.

: भाषणाचे निमंत्रण स्वीकारण्यात चूक नाही. पण इस्पितळ–योजनेतही सामील झालात हे कसे ?

: मला आठवतं, ऑगस्ट ७४ मध्ये इस्पितळाची योजना पुढे आली. एक दिवस मला बोलावून घेऊन त्यांनी मला ही योजना समजावून दिली. माझा कोणत्याही राजकीय पक्षाशी संबंध नव्हता व आजही नाही. पण जिजाऊसाहेबांच्या नावाने एक उत्तम स्मारक होणार आहे, पुतळा उभारण्याऐवजी लोकोपयोगी, विशेषतः गरीब रुग्णांसाठी इस्पितळ उभारलं जाणार आहे, या कल्पनेने मी एवढा मोहून गेलो की, त्या वेळी माझ्यापाशी असलेले सर्वच्या सर्व १२०० रु. मी तत्काळ देणगी म्हणून देऊन टाकले.

: हेही समजू शकते; पण त्या योजनेत एवढे गुरफटलात कसे ?

: गुरफटणे हा शब्द उचित नाही. इस्पितळाची योजना जनतेच्या नि तीही समाजाच्या तळातल्या वर्गाच्या हिताची आहे असं मला वाटल्याने मी सहकार्य दिलं. इस्पितळाच्या संचालकमंडळावर आपले नाव घातले तर चालेल का, असं शालिनीबाईंनी मला विचारलं. वैद्यकीय व्यवसायातलं मला काहीही समजत नाही, ही गोष्ट मी त्यांना सांगून पाहिली. तरीही मी संचालकमंडळावर रहावं अशी कार्यकर्त्यांची इच्छा असल्याचे त्यांनी वारंवार सांगितल्याने मी संमती दिली. एखाद्याने मोकळ्या जागी आंब्याचे झाड लावले, तर सर्वांच्याच पोराबाळांना आंबे मिळणार आहेत, या भावनेने मी त्याला तांब्याभर पाणी घातलं तर बिघडलं कुठे ?

: पण बाबासाहेब, तुमच्यावर लाचारीचा आरोप करण्यात आला आहे. शालिनीबाईंसमवेत दौरे काढून इस्पितळासाठी तुम्ही पैसे तर जमविताच, पण त्यापलीकडे तुम्ही त्यांची साक्षात जिजामातेशी तुलना करता, असं प्रसिद्ध झालं नाहे.

: झूट, झूट, साफ खोटं आहे हे ! माझ्याविरुद्ध हेतुपुरस्सर रान पेटविण्यात येत आहे असं मी म्हणतो ते हेच. सांगलीच्या पहिल्या सभेची माहिती मी तुम्हाला दिलीच. तीत मी शालिनीबाई हे नावसुद्धा उच्चारलं नव्हतं. कोणा एका लेखकाने (बाळ सामंत) कोल्हापूरच्या सभेतील माझ्या लाळघोटेपणाचं वर्णन केलं आहे; पण गेल्या किमान २ वर्षांत कोल्हापुरात माझं जाहीर भाषणच झालेलं नाही ही वस्तुस्थिती आहे. आजपर्यंत कोठल्याही सभेत कोणीही मला हटकलेलं नाही. एका वृत्तपत्रात पाझर तलावावरील कामगारांकडून आम्ही पैसे वसूल केले, असं वृत्त आलं आहे. वस्तुस्थिती आहे ती अशी की, राहुरी तालुक्यातील निपाणी गावच्या पाझर तलावावरील कामगारांचे एक नेते श्री. कारभारी पाटील आम्हाला मुद्दाम तेथे घेऊन गेले व इस्पितळासाठी आम्ही प्रत्येकी ४–४ आणे वर्गणी जमा करून देऊ, ती आपण स्वीकारा, अशी त्यांनी विनंती केली. टिळक–गांधींच्या चळवळीत भिकाऱ्यांनी आणा–दोन आणे दिले तेव्हा त्यांचे कौतुक झाले. इथे मात्र ती सक्ती होते !

: पण बाबासाहेब, इस्पितळाला मदत द्या असं आवाहन आपण करता त्या वेळी शालिनीबाईंबद्दल चार शब्द तुम्हांला बोलावेच लागत असणार. अशा वेळी आपण त्यांच्याबद्दल नेमकं काय सांगता ?

: शालिनीबाईंबद्दल अवश्य बोललो. त्या अत्यंत सिन्सियर आहेत अशी माझी खात्री पटलेली आहे. इस्पितळ उभारलं जावं यासाठी त्या १६–१६ तास काम करतात हे मी पाहिलेलं आहे. याच गोष्टी मी सभेत सांगतो. इस्पितळाचे काम म्हणजे मानवसेवेचे काम, रुग्णसेवेचे काम, म्हणून त्याला आपण सहाय्य केले पाहिजे, असे म्हणतो; पण शालिनीबाईंची जिजामातेशी मी चुकूनही कधी तुलना केलेली नाही. मला राजकीय पक्षांमध्ये स्वारस्य नाही, शालिनीबाईंसमवेत मी असलो तरी राजकारणासंबंधीच्या चर्चेत मी भाग घेत नाही.

: यावरून आठवण झाली. छत्रपती शिवाजीमहाराजांवरील चित्रपटात शालि-

नीबाईंनी जिजाऊसाहेबांची भूमिका करावी असा आग्रह आपण धरला हे खरं का ?

: हा आणखी एक विपर्यस्त प्रचार. शालिनीबाईंच्या मदतीने चित्रपटक्षेत्रातली काही मंडळी शिवाजीराजांवर चित्रपट काढणार आहेत. त्यात इतिहासविषयाचा एक सल्लागार एवढंच माझं मर्यादित स्थान आहे. चित्रपटात कोणी काय भूमिका कराव्यात याचा माझ्याशी काय संबंध ? वृत्तपत्रांत काही गोष्टी प्रसिद्ध झाल्यावर कोल्हापूरच्या चित्रपटक्षेत्रातील काही मंडळींनी मला हाच प्रश्न केला होता. तेव्हा या संबंधात काहीही ठरल्याचे मला माहीत नाही असं सांगून मी माझ्या भूमिकेचा खुलासा केला होता.

: शिवस्मारक प्रतिष्ठानचे ५ लक्ष रु. आपण ठेव म्हणून शालिनीबाईंना दिलेत. स्मारकाचे पैसे आपण या कामी कसे काय लावलेत ?

: पैसे शालिनीबाईंना व्यक्तिगत देऊ केलेले नाहीत. जिजामाता इस्पितळाचा जो ट्रस्ट आहे त्याने ही रक्कम आमच्या स्मारक प्रतिष्ठानकडे मागितली. 'सिडको' या संस्थेकडून जिजामाता ट्रस्टने एक इस्पितळ घेण्याचं ठरविलं आहे. त्यासाठी सिडकोला २५ लक्ष रु. द्यायचे असून सुमारे ५ लक्ष रु. पहिला हप्ता म्हणून तावडतोब द्यावयाचे आहेत. हा हप्ता भरण्यासाठी शिवस्मारक प्रतिष्ठान काही दिवसांसाठी ठेव देईल काय, अशी विचारणा जिजामाता ट्रस्टकडून स्मारक प्रतिष्ठानकडे पत्राने करण्यात आली आहे. हे पैसे आम्ही जिजामाता ट्रस्टकडे ठेवीच्या स्वरूपात ठेवले तर आम्हांला दोन टक्के व्याज अधिक मिळेल; पण अद्याप हे पैसे दिले गेलेले नाहीत. काही शासकीय अडचणीमुळे हे पैसे आजच देता येत नाहीत, असे प्रतिष्ठानच्या विश्वस्तमंडळाने जिजामाता स्मारक ट्रस्टला कळविले आहे.

छत्रपति शिवाजीमहाराजांच्या जीवनावर संशोधनपर कार्य करणाऱ्या पुणे-मुंबई-नागपूर येथील संशोधकांना व संशोधनमंडळांना आमचे प्रतिष्ठान अनुदाने देते व देणार आहे. प्रतिष्ठान ट्रस्टच्या नियमाचा भंग अजून कधीहि आम्ही केलेला नाही. व्यक्तिशः मी अनेक कार्यांना आत्तापर्यंत सहज तीन लाखांच्यावर रक्कम दिलेली असेल. साने गुरुजी विद्यालयाला आणि दादरच्या अंधशाळेलाहि मी मदत करणार आहे. छत्रपति शिवजीमहाराजांच्या अस्सल समकालीन चित्रांवर ग्रंथ लिहिण्यासाठी आम्ही पाऊण लाख रुपये प्रतिष्ठानमार्फत मंजूर केले आहेत. संशोधनपर कार्यासाठी पुढच्याच महिन्यात आम्ही तीस हजार रुपये संशोधनमंडळांना देणार आहोत. अतिकष्टाने मिळविलेला हा पैसा शिवकार्यासाठीच आहे. तो शिवकार्यार्थच खर्च होईल.

काही शाळा, ग्रंथालये, पं. सातवळेकर-सत्कार, इतिहाससंशोधक खरे-सत्कार अशा कार्यासाठीही मी आजपर्यंत पैसे दिलेले आहेत. सांगण्याचा उद्देश हा की, शालिनीबाईंसाठी आम्ही सर्व नियम, संकेत गुंडाळून ठेवीत आहोत, हे खरं नाही.

: बाबासाहेब, आपल्या शिवस्मारक प्रतिष्ठानकडे किती निधी जमला आहे, त्याचे विश्वस्त कोण हेही एकदा जाहीरपणे जनतेसमोर यायला नको का ?

: मी या गोष्टी माझ्या भाषणांतून वारंवार सांगतच असतो. आमच्या ट्रस्टचे नाव आहे 'महाराजा शिवछत्रपती प्रतिष्ठान ट्रस्ट, सातारा.' माझ्यासह ट्रस्टचे सात विश्वस्त आहेत. ते म्हणजे सुमित्राराजे भोसले, प्रतापसिंहराजे भोसले, मुकुंदराव दाबके, अप्पासाहेब आहेरराव (दोघेही साताराचे सामाजिक कार्यकर्ते), अच्युतराव कोल्हटकर (पुण्याचे कार्यकर्ते) व श्री. बन्याबापू गोडबोले. 'श्री. गोडबोले हे 'वेस्टर्न इंडिया ट्रस्टीज अॅन्ड एक्झिक्यूटर कंपनी, लि. सातारा' या संस्थेचे अध्यक्ष आहेत. ही कंपनी आमच्या ट्रस्टची होल्डिंग व मॅनेजिंग कंपनी म्हणून काम पाहते. आमच्या विश्वस्तमंडळाचे निर्णय एकमताने घेतले जातात. मतभेद झाले तर मताधिक्याने निर्णय न घेता आम्ही तो विषय गाळून टाकतो.

: आमच्या प्रतिष्ठानकडे सुमारे ७ लक्ष रुपयांची रोकड असून आमची मिळकत सुमारे ४ लक्ष रुपयांची भरेल. प्रतापगडावरील इमारत, शिवचरित्र आदी ग्रंथ हा मिळकतीचा प्रमुख भाग झाला.

: या निधीतून आजपर्यंत काही कामं झाली की जिजामाता इस्पितळाला मदत हेच पहिलं काम ?

: अनेक कामं झाली. प्रतापगडावरील एक जुना तलाव आम्ही दुरुस्त केला. तिथे एक सभागृह, एक अतिथिगृह बांधले. मुंबईला गतवर्षी शिवसृष्टी उभारली ती याच निधीमधून. त्या प्रदर्शनाचा व प्रतिष्ठानचाही विस्तृत अहवाल तयार होत असून लौकरच तो प्रसिद्ध होईल. प्रतिष्ठानसाठी निधी जमविण्याचे काम मुख्यतः माझ्याकडे असते. ते काम सांभाळून केवळ जाता जाता शालिनीबाईंना मी मदत करीत आहे.

आमच्या प्रतिष्ठानचा मुख्य उद्देश एखाद्या किल्ल्यावर शिवाजीमहाराजांचे एक हालते, चालते-बोलते असे भव्य स्मारक (म्युझियम) उभारणे हा आहे. मात्र ही योजना अतिप्रचंड खर्चाची आहे व आजपर्यंत जमलेला पसा त्या मानाने अपुरा आहे. याचबरोबर, शिवाजीमहाराजांच्या संबंधातील स्मारकांना व अन्य पवित्र कार्यांना साहाय्य करणे हाही प्रतिष्ठानच्या उद्देशांपैकी एक उद्देश आहे. जिजामाता स्मारक इस्पितळाचे कार्य आमच्या उद्देशांशी सुसंगत व पवित्र असल्यामुळे त्यासाठी ठेव देण्याचा निर्णय पुन्हा सांगतो, काही शासकीय अडचणींमुळे प्रत्यक्षात अद्याप घेण्यात आलेला नाही.

याच उद्देशांनुसार आम्ही प्रतापगडावर आधी उल्लेखिलेली सुमारे १॥ लक्ष रुपयांची बांधकामे केली. याखेरीज शिवचरित्र संशोधन, लेखन, प्रकाशन यासाठीही आम्ही अनुदाने देतो. मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, विदर्भ संशोधनमंडळ, शिवचरित्रग्रंथालय (नागपूर) व भारत इतिहास संशोधक मंडळ या संस्थांना आम्ही अनुदाने देत आहोत. काही इतिहाससंशोधकांना आम्ही आर्थिक सहाय्य केले असून राष्ट्रसेवादलाच्या पथकालाही मदत केली आहे. सर्व मिळून ही रक्कम ३० हजार रुपयांपर्यंत जाईल. याच निमित्ताने मी असे आवाहन करू इच्छितो की, शिवचरित्रसंशोधनाबद्दल ज्या तरुण इतिहासकारांना आस्था असेल त्यांनी आमच्या ट्रस्टचे साहाय्य घ्यावे.

: बाबासाहेब, एक घरगुती प्रश्न. आपला चरितार्थ कसा चालतो ?

: माझी १५-१६ पुस्तकं आहेत.त्यापासून मिळणारी रॉयल्टी व पर्वतीगावात माझं एक वडिलार्जित घर आहे त्याचं भाडं यांमधून माझा संसार चालतो.

: बाबासाहेब, आपण गेली २०-२२ वर्षे महाराष्ट्रभर शिवगौरवगाथा सांगत हिंडत

आहात; पण यामधून जे घडतं आहे ते गौरवास्पद आहे असं म्हणता येणार नाही. रामनवमीला रामजन्माच्या सोहळ्यानंतर जसा सुंठवडा वाटतात, तसं आपल्या भाषणातील राज्याभिषेकसमारंभाच्या कथनानंतर लोक शिंगं फुंकतात, चौघडा वाजवतात नि साखर वाटतात. सांगलीला तर हत्तीवरून साखर वाटली गेल्याचं मी ऐकलं आहे.

: अहो, हे खरं नाही. हत्तीवरून साखर वाटली हे कुणी सांगितलं ? मी अशा गोष्टींना चुकूनही उत्तेजन देत नसतो.

: पण आपली कुर्निसात करण्याची पद्धत...

: कुर्निसात नव्हे, मुजरा म्हणा !

: बराय, मुजरा ठोकण्याची पद्धत विद्यमानकालाशी पूर्णतः विसंगत नाही का ? आणि बाबासाहेब, तरुण पिढीची या बाह्य गोष्टींचंच अनुकरण करण्याची प्रवृत्ती असते.

: मी सरसकट सर्वांना मुजरा करीत नाही. मुजरा केवळ शिवाजीमहाराजांच्या गादीला. सातारच्या राजघराण्यातील व्यक्तींखेरीज इतर कुणालाही मी मुजरा केलेला नाही. मला आठवतं, एकदा महाराष्ट्रातले अनेक राजेरजवाडे जमले होते. विजयाराजे शिंदेही तिथं होत्या; पण मी मुजरा केला केवळ सुमित्राराजे व प्रतापसिंहराजे यांनाच. इतरांना केला नुसता नमस्कार आणि इतरांनी मुजरा करण्यास माझा विरोध असतो. माझ्या कार्यवाहालाही मी मुजरा करू देत नाही. माझ्या घराण्याची परंपरा मी पाळतो.

आणि आधुनिक कालाशी संबंध म्हणाल, तर माझ्या भाषणात विद्यमान कालाच्या गरजांशी सुसंगत असेच माझे प्रतिपादन असते. आपला एकुलता एक मुलगा अफझलखानासारख्या दैत्याच्या भेटीस पाठविण्यास जिजामाता तयार झाल्या; मग तुमच्या मुलांना सेनादलात पाठविण्यास का घाबरता, असा सवाल मी विचारतो. आजच्या तरुणांमधून चाफेकरबंधू, बाबू गेनू असे नरवीर निर्माण का होऊ नयेत? चोरट्या आयातीशी आपण सामना का करीत नाही, परदेशी मालावर बहिष्कार का टाकत नाही, असे प्रश्न मी विचारतो. शिवाजीराजांच्या विविध जीवनपैलूंचा, म्हणजे त्यांचे सैनिकी नेतृत्व, लष्करी संघटनेचे वैशिष्ट्य, राज्यव्यवस्था आदींचा अभ्यास झाला पाहिजे; त्यांचा जन्म किती सालचा, आग्र्याहून ते पेटाऱ्यातून पळाले की आणखी कशातून या विषयांच्या संशोधनात शक्तीचा अपव्यय करू नका, हे तर माझे नेहमीचं सांगणं असते. थोडक्यात म्हणजे शिवचरित्रामुळे डोळे दिपता कामा नयेत, डोळे उघडले पाहिजेत, हे माझ्या प्रचाराचे सूत्र म्हणता येईल.

: आपण गेली दोन तपे हा प्रचार करीत आहात. आपला अनुभव काय आहे ? तरुण पिढीत खरोखरच काही जागृती दिसते का ?

: निश्चित दिसते. तरुणवर्ग देशाभिमानी बनत आहे, समाजकार्याला सामोरा जात आहे, समाजाचे ऋण फेडण्याची भावना वाढीला लागत आहे असं मला वाटतं.

: बाबासाहेब, आपण एक साक्षेपी इतिहाससंशोधक व शैलीदार लेखक आहात. इतिहाससंशोधन करून मराठ्यांचा व भारताचा इतिहास ग्रंथरूपाने आपण जनतेसमोर ठेवावा, अशी आपल्या अनेक चाहत्यांची अपेक्षा आहे. आपण मात्र एका शिवचरित्रानंतर लेखणी बाजूला ठेवून दिलीत.

: हे पाहा, मी हाडाचा शाहीर, कीर्तनकार, गोंधळी आहे. आपल्या देशाबद्दल, आपल्या इतिहासाबद्दल सर्वसामान्य लोकांत अभिमान निर्माण व्हावा, त्यांच्यात समाजकार्याची भावना वाढीला लागावी यासाठी लहान प्रमाणात का होईना, मी प्रयत्न करीत असतो. जागृतीसाठी शिवचरित्र हे सर्वोत्कृष्ट साधन आहे, राष्ट्ररचनेचं ते प्रभावी हत्यार आहे अशी माझी भावना आहे. शिवचरित्रासारखे अन्य परिणामकारक साधन समाजजागृतीसाठी मिळणार नाही, अशी माझी श्रद्धा आहे. हीच श्रद्धा दीर्घकाल माझ्या कामी आली. पुढेही ती येईल, असा माझा विश्वास आहे. □

[ ब. मो. पुरंदरे यांचे छायाचित्र राजेंद्र फोटो स्टुडिओ, राहुरी. ]




अभय बंग हे मूळ नागपूरचे. चंदीगड येथे सहा महिने M. D. च्या अभ्यासक्रमाला होते; परंतु तो अभ्यासक्रम मध्येच सोडून देऊन त्यांनी ग्रामीण विभागात कार्य करण्याचे ठरविले. सध्या ते उत्तर प्रदेशात आहेत.

# गेंदवा नाही फुले । गेंदवा नाही फुले

## अभय बंग

जंगल सगळीकडे नुसतं पेटलं होतं पळसांनी ! होळीच्या अगोदर पळस जेव्हा पिसाटासारखा फुलतो आणि केशरी फुलांनी झाकून जातो, तेव्हा पेटत्या होळीपेक्षा वेगळा दिसत नाही. झाडाखाली निखाऱ्यांनी जमीन झाकली जाते. पारिजातही जमीन झाकतो; पण ते सत्यभामेसाठी ! पळसाची उग्रता और ! आणि हे जंगल तर पळसांनी गच्च भरलेलं आहे. वणव्यातून जात असल्यासारखं वाटत होतं.

आज सकाळीसकाळीच पोखऱ्याला जायला निघालो. पोखरा गांव इथून तीस मैल. तिथं काही पेशंटस् बघायचे होते. एक सभाही ठेवली होती, आदिवासी गावकऱ्यांची. सायकलवर मागे औषधांची व समोर सामानाची बॅग बांधली. सोबत जगदीश होता. जगदीश जवळच्याच एका गावातला, आठवी नापास पोरगा. इथे कंपाउंडरी शिकला. बरीच मदत होते त्याची.

सूर्योदय झालेला होता. गेल्या अनेक वर्षांत शहरांच्या गर्दीत हरवलेला सकाळचा सूर्य इथे पुन्हा भेटला आहे. रस्ता सगळा जंगलातूनच. जंगल नाले, टेकड्या ! त्यामुळे सायकल चालवण्याचा अर्थ एवढाच की चढावावर पायी उतरून तिला ओढत वर न्यायची आणि उतारावर ब्रेक्स् करकचून दाबून हळूहळू खाली सरकू द्यायची. सायकल असल्याचं केवळ समाधान. अशा तऱ्हेने तीस मैल जायच. माझं धावं दणाणलं. जगदीशवर काही परिणाम नव्हता.

### आठ वर्षांचा मजनू

नाल्याजवळ एक सातआठ वर्षांचा पोरगा मोहाची फुलं गोळा करीत होता. जगदीशला पाहून हसून ओरडला, 'मोर ससुवा कैसन बा ?' माझा सासरा कसा आहे ? सालं काय इब्लिस कारटं ! अगदी पुण्यात शोभेल. मी पुटपुटलो. इब्लिसपणा आणि पुणं यांची सांगड माझ्या मनात फार पक्की बसली आहे. तसं नागपुरातही दहाअकरा वर्षांच्या पोरांना 'अपनी चीज' 'अपना क्लास' असल्या उल्लेखांनी, स्वतःच्या आवडीच्या व स्वतःसाठी निवडलेल्या फ्रॉकधारी पोरीबद्दल बोलताना मी पाहिलं आहे. कॉलेजमध्येही पाचसहा वर्षं आम्ही सर्व आपापल्या मित्राला त्याची भावी वहिनी कोण आणि तीच का हे समजवण्यात गुंग होतो. ( गेले ते दिवस ! ) पण इथेही ! आणि इनमिन सातआठ वर्षांचं पोरट्टं !

'चांगला आहे आता' जगदीश ओरडला. 'आपल्या दवाखान्यात जो मटुकधारी नावाचा पेशंट आहे ना त्याचा हा जावई आहे,' हे माझ्याकडे वळून माझा श्वासच अडकला. 'लग्नाच्या वेळी हा आठदहा महिन्यांचा होता. रडायला लागला म्हणून याची आई दूध पाजायला लागली. दूध पितापिताच याचं लग्न लागलं,' त्याने मला आणखी माहिती पुरवली.

रस्त्यात मधेमधे भेटणारे पेशंटलोक ओळख ठेवून नमस्कार करायचे तेव्हा माझी बोनटेक्स कॉलर आणखी कडक होत होती; पण तिचा सारा ताठपणा किरविल गावान नाहीसा झाला. काही दिवसांपूर्वी एक ब्रेस्ट अॅब्सेसची पेशंट आली होती माझ्याकडे या गावातून. पण 'चिरा द्यावा लागेल' म्हटल्यावर तिची सासू, माझ्या सर्व धोक्याच्या सूचनांकडे दुर्लक्ष करून, तिला चक्क परत घेऊन गेली. रस्त्यावरच तिच घर लागलं म्हणून बघायला गेलो की, कशी आहे पेशंट आता. कळलं की माझ्याकडून परत आणून त्यांनी तिला इथल्या गावठी दाईकडे नेलं व तिने सळई गरम करून ...

ऊन चढलं होतं आता. मृगजळ झळकायला लागलं. जमिनीतून वाफा उठल्यागत गरम हवा हेलकावत वर चढायला लागली. त्यामुळ पळस आता खरोखरच आगीच्या ज्वालांसारखे दिसायला लागले. हिंदी फिल्मवाले काश्मीरमध्ये गर्दी करण्याऐवजी असली दृश्ये का टिपत नाहीत ?

### तीस मैल

पोखऱ्याला पोचेपर्यंत मी अगदी संपलो होतो. पाय दगडासारखे जड झाले होते. हातावर फोड उठले होते. पेशंटस् कसे काय इतकं अंतर आजारी अवस्थेत चालून दवाखान्यापर्यंत येतात कोण जाणे ! तीस मैलांहून जवळ त्यांना डॉक्टर नाही. दहा मैलावर प्रायमरी हेल्थ सेंटरवर सरकारी डॉक्टर आहे, पण गाववाले त्याला मोजत नाहीत व त्याच्याकडे जातही नाहीत. कारण नंतर समजलं !

हा पूर्वी उत्तर प्रदेशमधला मिर्झापूर जिल्हा. मध्यप्रदेशचा सरगुजा जिल्हा हा मिर्झापूर, बिहारचा पलामू जिल्हा व पुढे ओरिसा. भारतातला अत्यंत मागासलेला पट्टा. मुख्यत: आदिवासी जनता येथ बनवासी सेवा आश्रम या संस्थेच्या सोबत गेले काही दिवस काम करतो आहे. आधुनिक तऱ्हेची शेती. लघुउद्योग, शिक्षण आणि आरोग्यसेवा या चार कार्यक्रमांद्वारे इथल्या लोकांना संघटित करून विकास आणि समाज-परिवर्तन दोन्ही सोबत साधण्याचा प्रयोग इथे सुरू आहे.

### गांधीजींची जात

पोखरा गावातली एक झोपडी. हे आमच्या संस्थेचं केंद्र आहे इथलं. अर्थात आसपासच्या घरांकडे बघता झोपडीदेखील चांगली

असं म्हणण्याची पाळी. गरिबी, अज्ञान, रोग व अत्याचार यांना पारावार नाही. जातीयवाद तशा स्थितीतहि पाठ सोडत नाही. झोपडीत गांधीजींचा एक फोटो. 'गांधीजी कौन जात थे ?' जगदीश विचारता झाला. गांधीजीचीही जात विचारणारा हा पहिलाच माणूस मला भेटलेला. 'बनिया होते' मी उत्तरलो. 'बनिया होकर भी इतना अच्छा काम कैसे क्या किये ?' जगदीशचा प्रश्न.

झोपडीत बसून मी एक शेतीवरचे पुस्तक चाळत होतो. माझं शेतीचं ज्ञान अगाध आणि गावात शेतीविषयी माहिती असल्याखेरीज निभणं कठीण. आजुबाजूला पोरंसोरं आणि म्हातारे गोळा झाले होते, दोघांच्याही ज्ञानाचा स्तर सारखाच ! पुस्तकातली चित्रं पाहून ते आपल्या ओळखीची एखादी वस्तू त्यात दिसते का हे कुतूहलाने बघत होते. द्राक्षांचा घड पाहून काहीजण ओरडले. 'टमाटर !' द्राक्ष तर त्यांनी कधी पाहिलीच नव्हती, पण टमाट्यांचंही नावच ऐकलं होतं. मी ते पुस्तक बंद केलं. द्राक्षामध्येही टमाटे बघण्यात त्यांचा उत्साह उतू जात होता, अज्ञानात देखील आपल्या ओळखीच्या खुणा धुंडाळण्यात माणसाला किती आनंद वाटतो ! मी स्वतःच नाही का परवा एका म्हातारीच्या चेहऱ्यात सत्यजित रायच्या 'पथेर पंचाली' मधल्या त्या अद्वितीय म्हातारीचा, आपूच्या अजीचा, चेहरा बघत होतो ?

ही दृष्टी सुटत नाही. ज्या मध्यमवर्गीय आणि सुशिक्षित वातावरणात माझा पिंड बनला, तो डोळा त्यागून मला या लोकांशी एकरूप होता येत नाही. त्यांची प्रत्येक गोष्ट मी माझ्या चष्म्यातून बघतो. आपलेच संस्कार, आपलेच शिक्षण व त्यावर पोसलेली बुद्धी हे अंतर कापू देत नाही मग त्यांच्या गरिबीचे मी माझे अर्थशास्त्रीय अर्थ लावतो, त्यांच्या राहणीत माझ्या सांस्कृतिक परिभाषा शोधतो, त्यांच्या भाषेत मराठी शब्द धुंडाळतो व कुणा एका विद्वानाचे मत, (की मराठी माणसं मूळची इथली, इथून महाराष्ट्रात गेली) आठवून महाराष्ट्रापासून दूर असल्याचं दुःख कमी करतो. माझा भूतकाळ, माझा सांस्कृतिक संदर्भ कुंपण बनलाय. ही भिंत पाडणं मोठं कठीण होतंय्. आपणच आपले वैरी !

### शंभर रुपयांचं नुकसान

पेशंट्स गोळा झाले. खरूज आणि क्षयरोग इतके अधिक आहेत की मला स्वतःच्या अंगावर देखील त्यांचा भास व्हायला लागतो. डेफिशियन्सी रोगांना तर रोग मानणंच सोडून दिलंय्; पण आठवण राहिली आहे बिसनाथची ! त्याच्या मुलीला देवी निघाल्याबरोबर तो मोठ्या आनंदाने धावत बातमी द्यायला सरकारी दवाखान्यात पोचला, कारण देवीच्या केसची प्रथम माहिती देणाऱ्याला शंभर रुपयांचं बक्षीस मिळेल हे जागोजागी जाहीर झालेलं; पण त्याच्या मुलीला देवी नसून कांजण्या आहेत हे डॉक्टरने सांगितल्यावर त्याला फार खंत वाटली. हळहळत होता.

एक म्हातारा औषध घेतल्यानंतर, मोठ्या कौतुकाने माझ्याकडे बघत बोलला, 'न रे डागदार वा' ए रे डॉक्टरा खूप चांगलं केलंस तू इथे आलास. तुला काय 'आशीर्वाद देऊ ? खूप लवकर तू कंपाऊडर होशील !

तसा मला त्याने बराच चांगला आशीर्वाद दिला. अशाच एका कलेक्टरला दुष्काळात चांगलं काम केल्याबद्दल 'न रे कलकटरवा' म्हणून सुरू करून, लवकर दरोगा बनण्याचा आशीर्वाद दिला होता.

गाववाल्याचं स्थळ आणि काळ यांचं गणितच वेगळं. त्यांनी 'इथेच तर आहे, दोन कोस' असं म्हटलं की दहा मैलांची निश्चिती समजावी. 'जवळच' असलेल्या पेशंटपर्यंत पोचायला तीन तीन तास चालावं लागलं आहे. त्यामुळे अकरा वाजता जाहीर केलेली सभा दुपारी दोनला सुरू झाली. तेव्हा मी समाधानी होतो. शंभर–दीडशे जण गोळा झाले होते. केवळ रोगांचा उपचार करतो म्हटलं, तर या शंभर गावांमध्ये मी एकटा कितपत पुरणार ? म्हणून गावामध्ये जाऊन उपचार करण्याच्या निमित्ताने लोक गोळा झाले व त्यांचा विश्वास प्राप्त झाला की रोग कसे टाळावेत, घरगुती उपाय कसे वापरावे थोडक्यात, डॉक्टरची गरज कशी कमी करावी याची माहिती मी त्यांना देतो. स्वच्छता, आहार, पाणी, आरोग्य याविषयी माहिती सांगतो.

गावामध्ये भाषण हा माझा नवा अनुभव आहे. इंग्रजी शब्द एकही न वापरता बोलणं हीच माझ्यासाठी तारेवरची कसरत बनलीय्. त्यांना समजेल, लक्षात राहील अशा भाषेत, त्यांना प्रत्यक्षात आणता येतील अशा गोष्टी सांगणं हे शिक्षण मला स्वतःलाच अगोदर घ्यावं लागतंय्. सगळा बौद्धिक दिमाख आणि 'ज्ञाना'ची झूल उतरवून 'सोपं, अधिक सोपं' हे ध्येय बनलंय् ! हो चि मिन्ह म्हणे, आपलं सगळं लिखाण अगोदर अशिक्षित शेतकऱ्यांना वाचून दाखवायचे व त्यांना न कळलेला प्रत्येक शब्द, प्रत्येक वाक्य उडवायचे. स्वतःला नष्ट केल्याशिवाय त्यांच्यापर्यंत पोचता येत नाही, त्यांच्या गावातले रोग त्यांनाच अगोदर सांगायला लावून मग मी त्यावर उपाय सांगतो. त्यामुळे डॉक्टरने खास आपल्यासाठी हे उपाय सांगितले, असं त्यांना वाटतं. खरं म्हणजे सर्वच गावात मी हेच रोग व तक्रारी ऐकतो. गेल्या काही दिवसांच्या अनुभवाद्वारे मला लक्षात आलंय् की, नेत्याचं भाषण आणि डॉक्टरचं भाषण यांमध्ये ते फरक करतात. डॉक्टरचं भाषण लक्षपूर्वक ऐकतात व थोडं थोडं आचरणातही आणतात. फायदा झाला म्हणजे कौतुक करतात.

कधीकधी मात्र त्यांच्या समस्यांसमोर मी अगदी फ्लॅट होतो. इथे अॅनिमिया खूप आहे. आयर्नच्या गोळ्या इतक्या मोठ्या प्रमाणावर वाटणं शक्य नाही. जंगलात आवळे खूप आहेत. आवळ्यात लोह बरंच असतं म्हणून मी त्यांना चार चार आवळे सकाळी–संध्याकाळी खायला सांगायला सुरुवात केली व आपलं वैज्ञानिक ज्ञान असं व्यवहारी करून वापरल्याबद्दल स्वतःची पाठ थोपटली.

पण आज सांगितल्यावर एक म्हातारी म्हणाली की, 'बेटा, तू बात तो बढीया बताताबा !' पण आवळा खाल्ल्याने भूक खूप लागते व खायला तर आमच्याजवळ काही नसतं ! त्यामुळे जास्तच त्रास होतो. आवळा न खाल्ल्याने कमजोरी राहिली. सुस्तीमध्ये भूक कळत नाही; पण ती जागली तर तिला आम्ही कशी शमवणार ?'

तेव्हा मोठ्या प्रयासानं परतवलेले अश्रू आता लिहिताना गोळा होताहेत. पर्ल बक्च्या 'द गुड अर्थ'–मध्ये एक प्रसंग आहे. भीषण दुष्काळात उपासमार होत असलेलं एक चिनी शेतकरी कुटुंब. भुकेपायी पोरं माती खायला लागतात. बाप त्यांना म्हणतो की, 'बाबांनो, माती खाऊन काही फायदा नाही. शक्ती नाही येत त्याने. त्यावर लहान पोर उत्तरतं, 'ही शक्ती नाही येत पण पोट भरण्याचं

समाधान तर मिळतं !' हा एवढाच उपाय उरलाय् माझ्याजवळ त्या म्हातारीला सांगण्यासाठी !

## हा साक्षात्कार

कॉलेज व शहराच्या भिंतींबाहेर आल्याशिवाय हा प्रत्यय येत नाही. अर्थशास्त्राच्या पुस्तकात किंवा हिंदी सिनेमात गरिबी पाहणे वेगळे आणि पोटच्या पोरीला देवी निघाल्या नाहीत याची खंत वाटायला लावणारी गरिबी अगतिक बापाच्या रूपात प्रत्यक्ष बघणे वेगळे ! आणखीही किती तरी नव्या गोष्टी शिकतोय. हॉस्पिटल-मधल्या कितीतरी उपचार कल्पना इथे येऊन साफ धुऊन निघाल्या. खरूज केवळ माणसांनाच नाही तर जनावरांना होते. व त्यांच्यापासून डबक्यातल्या पाण्याद्वारे किंवा गोठ्यात झोपल्याने माणसाला लागते, ही मेडिसीनच्या पुस्तकात नसलेली माहिती इथेच मिळाली. केवळ वैद्यकीय प्रश्न दूर करून भागत नाही; आर्थिक समस्याही दूर कराव्या लागतात. याची जाणीव मला खरोखरी तेव्हाच झाली, जेव्हा बिगनीला दवाखान्यात भरती करून घेतल्यानंतर तिच्या बेरो-जगार नवऱ्यासाठी काम धुंडाळून देण्यासाठी मलाच हिंडावं लागलं. माओत्सेतुंगचं एक वाक्य पुनःपुन्हा आठवतं.

'Go to the people, love them live with them, learn from them, and plan with them, then act! Act for them with them !'

गरजा ( wants ) वेगळ्या आणि आवश्यकता ( needs ) वेगळ्या ! आपल्या दृष्टीने विचार करून त्याच्या ज्या आवश्यकता व प्राथमिकता ठरतील, त्यापेक्षा वेगळ्या त्यांच्या ज्वलंत गरजा अस-तात. त्यांच्या हृदयात प्रवेश करायचा असेल, तर त्यांच्या गरजांच्या प्रश्न अगोदर हाताळल्याशिवाय गत्यंतर नाही. खेड्यांच्या बहुतेक गरजा शेतीबाबत असतात. जमीन त्याच एका अक्षाभोवती त्यांचं जीवन, त्यांच्या समस्या आणि गरजा फिरत असतात. विनोबांसारख्या युगद्रष्टयाने ही गोष्ट ओळखली व सर्वप्रथम जमिनीच्या प्रश्नाला हातात घेतलं. हीच गोष्ट आणखी काही लोकांनीही ओळखली आहे व शोषणाच्या व अत्याचाराच्या आपल्या सर्व फासांनी इथेच आवळायला सुरुवात केली. सावकार, पटवारी, जंगलअधिकारी, जमीनदार आणि कितीतरी !

## जनता जागे घूसखोर भाग

सभा संपल्यावरही लोक आपले बसूनच जागच्या जागी चुळ-बुळत !' 'काय झाल ?' मी विचारलं.

एकमेकांवर ढकलाढकली करत शेवटी कोणी तरी सांगितलं की गावात पटवारी आला आहे आणि पावती न देता नियमापेक्षा तिप्पट पैसे महसुलाच्या नावाने गोळा करतो आहे. दरवर्षी हे असंच होतं. पावती मिळत नाही व काही दिवसांनी दुसरा कोणी पटवारी येऊन तोही पुन्हा महसूल वसूल करतो. आणि गाववाले पुन्हा निमूट-पणे पैसे भरतात. काही दिवसांनी आणखी तिसरा...

माझ्यासाठी हे अविश्वसनीय आहे ! 'तुम्ही पावती का मागत नाही ?' 'मांगी थी बाबूजी, लेकिन वो तो उपड दिया, फिर हम का करी ?' उत्तर.

जगदीश मला सांगतो की हे लोक पिढ्यानपिढ्या असेच आहेत. कोण्या अधिकाऱ्याला इतके घाबरतात की, केवळ एका छडीच्या बळावर पूर्ण गावाला शेळ्यांसारखं एकटा पोलीस हाकून नेतो. किंवा 'मुकदमा चला दंगा, थानेमें बंद कर दूंगा' असल्या केवळ धमकीने पटवारी, दारोगा यांच्याजवळून शेकडो रुपये वसूल करतात, वाटेल त्या नावाखाली. भीतीमुळे हे कुणाला सांगतही नाहीत ते ! तुम्हाला सांगितलं हेच खूप समजा !

बस् ! इथून पुढे जायचं नाही ! 'बोलवा त्या पटवाऱ्याला' एका-दोघांना पाठवलं. 'कोणाकोणाजवळून पैसे घेतलेत त्याने ?' बऱ्याच लोकांनी हात वर केले 'हे त्या पटवाऱ्यासमोर कबूल कराल ?' कोणीच तयार होईना ! पटवारी आमची तक्रार वर पाठवील ही भीती !

पावतीशिवाय पैसे घेणे भ्रष्टाचार आहे आणि त्यामुळे तो तुमची तक्रार वर करू शकत नाही. केलीच तर सर्व गाववाले मिळून झगडा. आम्ही तुमच्या मदतीला येऊ. इत्यादी इत्यादी...

बऱ्याच वेळानंतर चार-पाच जण तयार होतात. एकदा निश्चय झाल्यावर त्यांच्यात थोडा उत्साह येतो. जगदीश दोनतीनदा घोषणा लावतो, 'लोकनायक जयप्रकाश !' 'जिंदाबाद, जिंदाबाद !' हे नाव यांच्यापर्यंत पोचलंय आता. तितक्यात पटवारी यायला तयार नाही, असं सांगत आमचे निरोप परत येतात.

येत नाही कसा ? लोक जोरात आले आता. जगदीश पाच-सहा तरुणांना घेऊन जातो. काही वेळाने पटवाऱ्याला घेऊन ते परत 'सायकलपर भाग जा रहा था, दौड के पकडा !' तरुणांच्या तोंडा-वर उत्साह आणि आवेश नाचतोय् नुसता !

सभेसमोर पटवारी पेश होतो. 'क्या बात है पटवारीजी ? आप पैसा बिना रसीद के इकठ्ठा किये, और फिर हमसे बचकर भागभी जाना चाहते है ?' मी विचारतो.

अजूनही मुजोरी करायचा त्याचा विचार आहे. उर्मटपणाची हद्द नाही. शेवटी त्याला उलट टांगून तहसील ऑफिसमध्ये नेण्याची धमकी दिल्यावर मात्र नमतो. सगळे पैसे सभेसमोर परत करतो. 'माफी माँगिये, फिरसे ऐसा नहीं करेंगे' कहिये !' तेही होतं. तोंड लपवत तो नाहीसा होतो. जगदीश पुन्हा दोन-चारदा लोकनायक जयप्रकाशचे नारे लावतो आणि खडूने झोपडीच्या भिंतीवर लिहायला सुरुवात करतो–जनता जागे घुसखोर भागे !

पटवाऱ्याला असंच सोडून देण्याचं कारण होतं. इथं कितीही आवेश असला तरी तहसिलदारासमोर गाववाले माघार घेतील व आपल्याजवळून पैसे घेतल्याचंच नाकबूल करतील अशी मला खात्री होती. सध्या एवढंच पुरे.

'बाबूजी, रामेशर साहू हमारी जमीनपर कबजा कर लिया !' आता लोकांच्या अपेक्षा वाढल्या आहेत. 'फॉरेस्ट रेंजर हमसे दो सौ रुपया वसूल किया. बैल बेचना पडा' 'बंधू और हमारा जमीनका झगडा है बाबजी अदालत में हम बरबाद हो गये दोनो ! आपहि मिटा दीजिये !' काही अंत नाही. जमिनीच्या प्रश्नात मला गतीही नाही. शेवटी असं ठरतं की, गाववाले चोवीस तारखेला एक सभा करतील व आश्रमचे एक कार्यकर्ते येतील त्यावेळी या सर्व प्रश्नांचा विचार होईल. पण आपले झगडे आपसात मिटवायला आणि बाहेरच्या अन्यायाशी सर्व मिळून प्रतिकार करायला तुम्ही तयार असाल, तरच आमची मदत तुम्हाला मिळेल, हे मी त्यांना

बजावलं. गाववाले तयार झाले. जनता सरकारची सुरुवात हीच !

अमेरिकेत गुलामी इब्राहम लिंकनने संपवली म्हणे. भारतात अजून कोणी पैदा व्हायचा आहे. बापाने घेतलेल्या दोनशे रुपयांच्या कर्जाच्या बदल्यात जन्मापासून सावकाराचा गुलाम असलेला रामगरीब ! आणि तरी ते कर्ज आता अकराशे रुपये झालंय्. उत्तर प्रदेश सरकारने कायदा करून आदिवासींवरची सर्व सरकारी कर्जे बेकायदेशीर ठरवून रद्द केली आहेत; पण कोणाला माहीत आहे कायदा ? आणि त्याला पुसतो कोण ? जंगलातला महुआ वेचायचा सर्व आदिवासींना हक्क दिलाय् कायद्याने पण जंगलरक्षक त्यांना मारठोक करतात व दर झाडामागे पाच रुपये किंवा वेचलेला अर्धा महुआ वसूल करतात.

## अन्यायाची शस्त्रं

जमिनीचे घपले तरे अनंत ! पटवाऱ्याला, जंगलअधिकाऱ्याला लांच देऊन सावकारांनी जमिनी आपल्या नावावर करून घेतल्या आहेत. सरकारी कागदपत्रातही ताळमेळ नाही. महसूलखात्याचा नकाशा, जंगलखात्याचा नकाशा व पुनर्वसनखात्याचा नकाशा एकमेकांशी जुळत नाहीत. रीतसर सर्व्हे करून नकाशे बनवण्याऐवजी आपल्याच जागी तहसीलकचेरीत बसून त्यांनी नकाशे बनवून टाकले. त्यामुळे कुणाची जमीन कुणाच्या नावावर, तर, कुणाची गायब ! शेतकरी करतोय् एक जमीन आणि त्याच्या नावावर दुसरीच ! आणि हे तिन्ही विभाग आपापल्या नकाशांनुसार त्याची इकडून तिकडे उचलबांगडी करीत राहतात. शेतीच्या एकएक इंचाशी ज्याचा जीव जडलेला व जीवन विसंबलेल त्याच्या शेतीशी, शेतीच्या अधिकाराशी व भावनांशी अक्षरशः खेळ चाललाय् ! आणि विचारलं तर सरकारी विभागांची एकमेकांवर ढकलाढकली ! अलाहाबादच्या निवडणूकखटल्यात साक्षीदाराच्या कठड्यात उभं राहून इंदिरा गांधींनी कबूल केलं की, त्यांनी सही केलेल्या त्यांच्या काही निवडणुका कागदपत्रातल्या गोष्टी त्यांच्या लक्षात नाहीत. कारण, कायद्याची भाषा व प्रणाली फार किचकट आहे. मग ९४ टक्के निरक्षरता असलेल्या या आदिवासींना काय समजणार ? यामुळेच, 'मुकदमा चला दूंगा' ही धमकी त्यांना घाबरवून टाकायला पुरेशी आहे व या धमकीचा पुरेपूर उपयोग सावकार, पटवारी, पोलीस सर्वजण करतात. न्यायदानाची व्यवस्था अन्याय करण्याचं साधन बनलीय् !

निरक्षरता भयानक ! कल्पनेची जास्तीत जास्त भरारी म्हणजे आठवी नापास ! तोही गावात एखादाच ! त्यामुळे कागदाची त्यांना विलक्षण भीती वाटते. कागदावर एखादी गोष्ट लिहिली म्हणजे ती सत्यच होऊन जाते ही कल्पना. त्यामुळे नुसतं कागद आणि पेन या हत्यारांनीच त्यांची वाटेल तशी शिकार होत असते. जंगलची जनावरं आता बंदुकीला ओळखायला व घाबरून दूर पळायला लागली. आदिवासी कागद-पेनला घाबरतात व शरण येतात. अनुभव माणसाला काय शिकवत नाही ?

दुपारचं जेवण संध्याकाळी पाच वाजता मिळालं. मिळालं हेच खूप ! पोखऱ्यांच्या गावकऱ्यांना रामराम करून बमनीला निघालो. मध्येच एक डांबरी सडक लागली. दीड महिन्यानंतर आज प्रथम डांबरी सडक पाहिली. जुनी सखी भेटल्यासारखं वाटलं. दूर सुटलेल्या सुधारलेल्या जगाची एक ओळख !

## जंगलचा कायदा

रस्त्यात फॉरेस्ट रेंजरचं घर लागलं. दोन किलो म्हशीच्या तुपाच्या बदल्यात सावकाराला जंगलची पाचशे झाडं यानं तोडू दिली. गरीब आदिवासींना पदोपदी छळणारा. त्याच्याशी कधी ना कधी टक्कर घ्यावीच लागेल. आश्रमातर्फे त्याची तयारी सुरू आहे. आदिवासींना संघटित करण्याच्या रूपात. त्यामुळे मी त्याला आत्ताच भेटू इच्छित नाही. पण त्याची नजर पडतेच. माझा वेश दगा देतो. 'आईये जनाब, थोडा आराम कीजिये !' तो अंगणातून हाक मारतो. 'नही, अभी तो कोई थकान नही है, चलते हैं ! मी टाळतो. 'आइगा भी ! अजी तरुणोंके शब्दकोश में थकान यह शब्द कहाँ ?' यू. पी. बिहारचा कोणताही सुशिक्षित माणूस भाषणातल्या डायलॉगहून कमी काही बोलतच नाही ! नेते बनूनच पैदा होतात बेटे ! थोडी बोलचाल होते. 'काय, इथली माणसं कशी आहेत ?' मी विचारतो.

'...जनावरं आहेत नुसती !' 'नमस्कार' मी निघतो.

'हे हे ! डॉक्टरसाहब, कोई ताकत की दवा हो तो...'

'जगदीश, चलो !'

संध्याकाळ झालीय. पळसाच्या फुलांनी झाकलेल्या डहाळ्या आता मोहक दिसताहेत. सायकलीचं पायडल् एका तालावर खट्खट् वाजतंय्. जगदीश पूर्वी लोकसंगीताची लकेर सोडून देतो. 'एक दिन बुढापा आई रे, बिदेसी भाई !' मी त्यात माझ्या ओळखीच्या रागांचे सूर शोधतो. सवय जात नाही.

जंगल-दरोगा सायकलवर महुआचं पोतं लादून जातोय्. दिवसभर आदिवासींकडून लुटत लुटत गोळा केलं असणार. 'सलाम साहब !' तो माझ्या वेशाला सलाम करतो. मी बाहेरच्या सुधारलेल्या जगाचा माणूस आहे हे तो माझ्या कपड्यांवरून पटकन ओळखतो. 'सलाम. कहिये. आज तो काफी कमाई इकठ्ठा कर ली आदिवासियोंको सता कर !'

'नही नही साहब ! हम काहे सताने जाये ? हम तो झगडना नही चाहते, लेकिन हमको उपरसे घुडकी मिलती है !'

'अच्छा, तो आपने पांडेजीको पीटा और उनके खेतका बंधा तोड दिया, वह उपरसे ऑर्डर हुआ इसलिये या उन्होने इस साल रिश्वत देने को इन्कार किया इसलिये ?'

'नही नही आप देखिये......जैसाकि, मतसबकि...!'

'और रामसरन के खेतसे उसे क्यो बेदखल किया आपने, झूठेही कहके कि यह जंगल विभाग की जमीन है ?

'साहब, यह रेव्हेन्यू और जंगल के नक्शे में बहुत ओवरलॅपिंग है इससे यह गडबडी हुई ! पटवारी रेव्हेन्यू का नक्शा बनानेमें धांदली किया. अब देखिये नं, दुधीमें एक आदमीसे महसूली किया जा रहा था सत्तावन एकडका, जब्रकि असलमें जमीन थी सिर्फ दो एकड ! तो साहब, यह सब गडबडी नक्शोंकी है !'

हे एक लचांड आहे. प्रत्येक सरकारी अधिकारी हेच म्हणतो की 'साहब, यह सरकारमें बडी गडबडी है !' आता या अधिकाऱ्यांशिवाय भिन्न ही 'सरकारी' चीज आहे तरी कोण आणि कुठे ? सगळी आंधळी कोशिंबीर !

## कलियुगातले राम-सीता

रस्त्यात आदिवासींची एक भीड ढोलकं बडवीत जात होती. ‘ कुठे निघाली ही मंडळी ?’ मी जगदीशला विचारलं.

‘ माताजीच्या दर्शनाला !’

‘ हे काय प्रकरण आहे ?’

जगदीशकडून माहिती ऐकून मी थक्क झालो. ‘ माताजी ’ या दोनतीन जिल्ह्यातल्या आदिवासींचं दैवत ! मूळची गोंड बाई. अशिक्षित. तिला जंगलात म्हणे कोण्या साधूबाबाचा साक्षात्कार झाला. तेव्हापासून ती श्रद्धास्थान बनली. सुरुवातीला चांगली कामं केली. दारू वगैरे सोडवली आदिवासींची. तिचा प्रभाव एवढा की तिच्या आदेशानुसार सगळ्या दारू न पिणाऱ्या आदिवासींनी दारू पिणाऱ्यांवर बहिष्कार टाकला. बायका नवऱ्यांपासून, पोरं बापापासून वेगळी झाली. पंच्याऐंशी हजार आदिवासी अनुयायी होते तिचे एका वेळी ! पण पुढे तिचा मठ बनला ! तिने आपलं सरकार बनवलं. अगदी दरोगा, तहसीलदार कलेक्टर असे हुद्दे दिले. प्रधानमंत्री नेमले. लाखो रुपये, हजारो मण धान्य भोळ्या आदिवासींकडून गोळा व्हायला लागलं आणि त्यावर सगळी लुच्ची मंडळी मजा मारू लागली. ‘ माताजी ’ कुणाच्या हातचं खात नाही. त्यांची विहीर देखील खास वेगळी ! मिरवणुकीखेरीज चालत नाही.

वरून भर म्हणजे याच भागात एका आदिवासीनं जाहीर केलं की, तो प्रत्यक्ष श्रीरामचंद्राचाच अवतार आहे. चक्क मुकुट लावून, धनुष्यबाण, गदाचक्र घेऊन तो रामचंद्र बनून फिरू लागला. त्याला लक्ष्मण, भरत, शत्रुघ्न देखील भेटले. तेवढ्यात आणखी एक राम जाहीर झाला. मग दोन रामांची स्पर्धा ! त्यावर ‘ माताजी ’ बनल्या सीता व आपल्या पसंतीचा राम त्यांनी निवडला. त्यांचं स्वयंवर वगैरे झालं. (चक्क धनुष्यभंगाचा कार्यक्रम करून !) दुसरा राम बाद झाला. असं सर्व हे लफडं. हजारो आदिवासी यांचे अगदी भक्त. उपाशी राहून त्यांना प्रसाद, भेट, पैसे देतात. जागोजागी त्यांची मंदिरं. या युगात हे सर्व चालतं माझा विश्वास बसेना !

जगदीशने मला त्यांची दोन मंदिरंच दाखविली ! तर ही सर्व मंडळी चालली होती ‘ माताजी ’च्या दर्शनाला. ही गंमत बघण्याचं कोण सोडणार ? मीही सामील झालो. आम्ही पोचलो तेव्हा प्रभू रामचंद्राचं भाषण सुरू होतं. रामचंद्राचा वेश; पण पायात मोजे, हातात घड्याळ. मठातल्या काही लोकांनी पैसे खाल्ले व रामाविरुद्ध कट केला. त्यांना तो शिव्या देत होता. धमक्या देत होता. हातात कसला तरी सरकारी स्टँप असलेला एक कागद होता. तो वर फडकवत ‘ राष्ट्रपतींचा आदेश,’ ‘ प्रधानमंत्र्यांचा संदेश ’ असलं काही बडबडत होता.

त्यानंतर ‘ माताजी ’ पधारल्या. अगदी साधी दिसणारी चाळीस–पंचेचाळीस वर्षांची गोंड बाई ! गुडघ्यापर्यंत चढवलेली साडी, हातात तारेच्या दोन वेड्यावाकड्या बांगड्या, अनवाणी पाय, फाटलेले ! ती काय बोलली ते मला खास समजलं नाही; पण मध्येच तिने भक्तांना आदेश दिला की, ‘ जाओ, पूरे संसार में ऐलान कर दो, रामचंद्रजी का अवतार हो गया है !’ भक्तांनी ‘ हाँ माता ’चा गजर लावला. मग माताजीला कसला ताव चढला. त्यांना विरोध करणाऱ्याला भारताच्या बाहेर हाकलून देण्याचा आदेश त्या इंदिरा गांधींना देणार असल्याचं त्यांनी जाहीर केलं आणि राष्ट्रपतींनी सहा जिल्ह्यांचं राज्य त्यांना बहाल केल्याचीही बातमी ! सगळीच गंमत ! ही बाई काय वाटेल ते बडबडत होती आणि एक हजार काळे दगडी चेहरे टुकुर टुकुर बघत होते. श्रद्धा अगदी ओसंडत होती. समोर त्यांनी भेट म्हणून आणलेल्या रुपयांचा, धान्याचा मोठा ढीग लागलेला होता.

‘ माताजी ’ कशीही असो, तिच्या चेहऱ्यावर एक मोहक उदासीन छाया सदैव पसरलेली होती. पापण्या थोड्या झुकलेल्या, अर्धोन्मीलित ! यामुळेच आदिवासींना तिच्या चेहऱ्यात काही ‘ दैवी ’ असल्याचा भास होत असावा. मी विचार करत होतो— तिच्याकडे बघत. तितक्यात ‘ माताजी ’ अचानक कडाडल्या माझ्यावर, ‘ तू काहे घूर घूर के ताकते हो मोहे ?’ चायला ! ही म्हातारी स्वतःला अठरा-वीस वर्षांची पोरगी समजते काय, की माझ्या टक लावून बघण्याबद्दल तिला हरकत असावी !

रस्त्यावर आलो. दारूच्या दुकानात भीड लागली होती. आदिवासी दिवसभर काम करून रुपया–दोन रुपये कमवतात किंवा जंगलात महुआ गोळा करतात. त्यांच्या या कमाईचा सदुपयोग व्हावा म्हणून सरकारने जागोजागी गावठी दारूची दुकाने ठेके देऊन उघडली आहेत. नव्वद प्रतिशत आदिवासी दिवसाअखेरी तिथेच पोहोचतात ! बायका देखील ! दहा वर्षांची पोरंसुद्धा ! सगळा समाजवादी मामला ! आदिवासींना किक् मिळते व सरकारला ‘ समाजकल्याणा ’साठी पैसा ! आता नव्वद टक्के लोकांची आयुष्य बरबाद करून कुणाचं कल्याण करण्यासाठी सरकारला पैसा हवा कोण जाणे !

## सुशिक्षित वटवाघळं

प्रायमरी हेल्थ सेंटरचे सरकारी डॉक्टर तिथे सध्या आहेत असं कळलं. वर्षातून चार-सहा महिने ते सेंटरवर राहतात. बाकी वेळ शहरात आपल्या घरी. त्यांच्यावरचे अधिकारीही हेच करत असतात. कोणी कोणाला जाब विचारावा ? पंचवीस-तीस मैल चालून आमच्या दवाखान्यात येण्याऐवजी पेशंटस इथून औषध का घेत नाहीत, हा जो मला प्रश्न पडायचा त्याचं उत्तर हळूहळू सापडायला लागलं.

‘ नमस्ते, डॉक्टरसाहेब !’ मी मोठ्या उत्सुकतेने त्यांना भेटायला जातो. अगदी तरुण आहे. परिचय होतो. त्याला आश्चर्य वाटतं. ‘ चंदीगढ की मेडिकल इन्स्टिटयूट का एम. डी. छोडकर यहाँ काहे आये यार तुम ? बिल्कुल डेसोलेट इलाका है ! हम तो यहाँ ढाई ढाई सालसे काले पानी सजा भूगत रहे हैं !’ त्याची व्यथा.

मी त्याला स्पष्ट करतो, एम. डी. के बाद अपनेही देश के देहात काला पानी न लगने लगे इसलिये अभीसे कुछ आदत करने और अनुभव लेने आया हूं !

मी इथं काही काळासाठीच आलो आहे हे ऐकून त्याला हायसं वाटतं. नाही तर त्याला भलतीच चिंता वाटायला लागली होती माझी !

‘ इथे टी. बी. खूपच जास्त आहे नाही ? काही खास योजना आहेत का तुमच्या, याला कंट्रोल करण्यासाठी ?’ मी विचारतो.

टी. बी. ? कुठे आहे ? गेल्या अडीच वर्षात तर मी एकच केस पाहिली !

पृष्ठ २६ वर

# सोलकढी

## □ वाचक थोर; लेखकही थोर

शाळेत असताना, काही वर्षे, रहस्यकथां-पलीकडे दुसरे काही मी वाचले नव्हते. रहस्यकथा अर्थात बाबुराव आणि मधुकर या अर्नाळकर–बंधूंच्या. त्या वेळी अर्नाळकर–बंधूंशिवाय कोणी रहस्यकथा लिहीत नव्हते. आता पुष्कळ झालेत. अर्नाळकर–बंधूसुद्धा थांबलेले नाहीत. पण आता मी रहस्यकथा वाचत नाही. काही लोक ही गोष्ट खास डौलाने सांगतात तसे नाही मी सांगत. कारण असे की, आपण रहस्यकथा वाचत नाही असे सांगणारी माणसे आपण इतर श्रेष्ठ, मौलिक, जीवनस्पर्शी, विचारप्रवर्तक साहित्य वाचतो असे खुबीने सुचवत असतात. त्यांचे ठीक आहे; मी तसे खुबीने सुचवले तरी त्यावर कोणी तोंडदेखलासुद्धा विश्वास ठेवत नाही ही गोष्ट पुन्हा पुन्हा माझ्या अनुभवास आली आहे. त्यामुळे प्रामाणिकपणाचे दुर्मिळ श्रेय उपटण्यावर तेवढा माझा कटाक्ष असतो.

आता मी रहस्यकथा वाचत नाही याला, मागे मी रहस्यकथा वाचत होतो, हे कारण नाही. कॉनन डॉयल वाचलेला कोणी तसे म्हणतो; नाही असे नाही; पण त्याची गोष्ट वेगळी. एरवी कॉनन डॉयल तो कॉनन डॉयल, असे हळहळहळत्या सुरात जपण्यासाठी तरी कॉनन डॉयलचे वाचक इतर रहस्यकथा-कारांच्या कथा वाचून पाहतात, वाचत राहतात. त्याचसाठी डोरोथी सेयर्स आणि अगाथा ख्रिस्ती मी वाचल्या; पण कार्य-बाहुल्यामुळे पुढे रहस्यकथांचे माझे वाचन थांबले. कार्यबाहुल्यामुळेच रहस्यकथा वाचणारे वाचक माझ्या माहितीचे आहेत. मी त्यातला नाही.

अगाथा ख्रिस्तीने, हर्क्यूल पॉयरो या गुप्तपोलिसाच्या चातुर्याची अखेरची कथा 'कर्टन्स : पॉयरोज लास्ट केस' लिहिली आहे. गेली पंचावन्न वर्षे पॉयरोच्या चातुर्यकथा लक्षावधी वाचक अधाशीपणाने वाचत आहेत. वाचकांची भूक अगाथा ख्रिस्तीने भडकवली आणि भागवली. पण चौऱ्याऐंशी वर्षांच्या अगाथा आजीने आता मात्र पॉयरोला आपण-होऊन रजा द्यायचे ठरवले आहे. हे रजेचे बेंगरूळ आजीबाई वाचकांच्या अनुमतीवाचून कसे काय पार पाडणार, कळत नाही. कारण या बाबतीतला इतिहास लेखकांना धार्जिणा नाही. कॉनन डॉयलने एका कथेत शेरलॉक होम्सला मरायला घातले आणि स्वतः सुटकेचा निश्वास सोडला; पण शेरलॉक होम्सवर फिदा झालेल्या हजारो वाचकांना ही 'सुटका' मंजूर नव्हती. अखेर कॉनन डॉयलला वाचकांच्या इच्छेला मान देऊन शेरलॉक होम्सला पुन्हा जिवंत करावे लागले.

पुस्तकातली पात्रे अशी मृत्युंजय करणारे वाचक थोर;

त्यांचे लेखकही थोर. □

## □ जपानी हरिजन

हरिजनांना (गौरवाने यांना कधीकधी 'अस्पृश्य' म्हटले जाते.) येथे मिळणारी वागणूक, हे भारतीय संस्कृतीच्या अनेक परं-परापूत आणि म्हणून विलोभनीय वैशिष्ट्यां-पैकी एक होय. हरिजन माणसे आहेत हे का आपल्याला ठाऊक नाही? ते ठाऊक असल्याशिवाय का आपण घटनेत त्यांना समान दर्जा बहाल केला आहे? आपले म्हणणे इतकेच असते की, आपण ह्यांच्या-पेक्षा अधिक–माणसे असतो आणि अधिक–माणसांनी उण्या–माणसांशी वागायच्या स्वाभाविक पद्धती आपल्या प्रदीर्घ आणि म्हणून उज्ज्वल इतिहासात आपण निश्चित करून टाकल्या आहेत. सबंध देशभरच्या ज्या बातम्या वर्तमानपत्रांतून येतात त्या पाहिल्या म्हणजे आपण सारेच या पद्धती कशा एक-दिलाने कार्यान्वित करतो आहोत, हे लक्षात येते.

हरिजनांना आपण जी वागणूक देतो, ती इतकी आदर्श आहे की, जपानलासुद्धा तिचे अनुकरण करावेसे वाटले असावे. जपानी हरिजनांना 'बुराकुमिन' म्हणतात. खाटिक-काम करणे आणि कातडी कमावणे हे त्यांचे पिढीजात धंदे. त्यांची संख्या सुमारे वीस लाख आहे. आपले हरिजन जसे आपल्या-सारखेच दिसतात, तसे जपानी हरिजनसुद्धा हरिजनेतर जपान्यांसारखेच दिसतात. पण दिसते तसे नसते हेच खरे. जपानी हरि-जनांच्या सहा हजार वस्त्या सबंध जपानभर पसरलेल्या आहेत.

बुराकुमिनना समान वागणूक मिळावी असा कायदा अठराशे एकाहत्तरमध्ये झाला होता. एवढा कायदा होऊन आणि गेली एकशेचार वर्षे त्याची अंमलबजावणी होऊन देखील बुराकुमिनांचे समाधान कसे ते झालेले नाही. अखेर त्यांच्यातल्या राजा ढाले–नामदेव ढसाळांना 'बुराकू लिबरेशन लीग' नावाची दलित पँथरसारखी बंडखोर सेना उभारावी लागली. एका सेनेच्या दोन वा अधिक सेना कशा कराव्या याचे आपल्याला अवगत झालेले तंत्र जपान्यांना साधलेले नाही. पुढारी कमी आणि अनुयायी जास्त अशी स्थिती असल्यावर दुसरे काय होणार? तरीही 'बुराकू लिबरेशन लीग'ने आपल्या बंडखोरीचे सवर्ण जपान्यांकडून बुराकुमिनां-साठी काही सवलती मिळवल्या आहेत.

मात्र एवढ्यामुळे त्यांनी हुरळून जाऊ नये. जरा भारताकडे नजर टाकावी म्हणजे हरिजनांच्या प्रश्नाचे काय (आणि काय काय) होऊ शकते, याची योग्य आणि यथा-स्थित कल्पना त्यांना येईल.

–अनंतराव


बॉम्बे डाइंग
एकमेव वितरक
पराग
डेक्कन जिमखाना. ● लक्ष्मी रोड, पुणे
आज आपल्यासाठी
खास नवीन प्रकार
स्वस्त दरात
बेल बॉटम पिसेस
कुडता पिसेस



# पॅपिलॉन

मूळ लेखक : **हेन्री शॅरियर**

अनुवाद : **रवींद्र गुर्जर**

सेलियरचा संशय येऊनही त्याला वेळीच ठार न केल्यानं पुढे आठ वर्षांचा एकांतवास नशिबी आला. दिवस-रात्र स्वप्नांमध्ये वावरल्यामुळे पॅपिलॉन निराश होण्यापासून स्वत:ला परावृत्त करीत होता. त्यात मग त्याला स्कर्व्ही रोग झाला; परंतु आश्चर्याची गोष्ट म्हणजे सर्व आजारी कैद्यांवर बाहेर उघड्यावर औषधोपचार चालू झाला. डॉक्टरच्या सौजन्यामुळे अनपेक्षितपणे पॅपिलॉनची राहिलेली शिक्षा माफ होऊन तो रॉयेल बेटावर परत आला. गव्हर्नरच्या मुलीला शार्क माशांच्या तडाख्यातून वाचवण्याच्या प्रयत्नामुळे त्याचा वाईट काळ समाप्त झाला होता. पुन्हा पहिलं जीवन सुरू झालं. काही माथेफिरू लोकांनी सामुदायिक उठाव करायचं ठरवलं. त्यामध्ये पॅपिलॉननं साथ द्यायला नकार तर दिलाच, परंतू त्या सर्वांना परावृत्त करण्याचा प्रयत्नही केला. काही दिवसातच त्याला सेंट जोसेफच्या कॅम्पवर परत धाडण्यात आलं. तिथे बंडाला तोंड लागलंच. पुढे वाढून ठेवलेल्या संकटाला तोंड देण्यासाठी सर्वजण तयार झाले.

पहारेकरी कॅम्पच्या दिशेनं पिसाटासारखे धावू लागले. कामावर गेलेल्या सगळ्या कैद्यांना लाथाबुक्क्या आणि बंदुकांचे दस्ते मारून नजीकच्या ब्लॉकमध्ये ढकलण्यात येऊ लागलं. ते अत्यंत निर्दयपणे वाटेत येईल त्याला झोडपत होते. वाद्य, खेळांचं सामान आणि खायच्या वस्तू इतस्तत: भिरकावल्या गेल्या. नियमबाह्य चालू असलेले सर्व प्रकार नष्ट करण्यात आले. इतक्यात गोळ्यांचे दोन आवाज कानांवर पडले–ते पिस्तुलाचे होते.

कॅम्पमध्ये एकूण आठ इमारती होत्या, त्या सगळ्या ठिकाणी कमीजास्त तीव्रतेनं एकच हलकल्लोळ माजला होता.


आणि आमच्या ब्लॉकच्या दिशेनं त्यांचा मोर्चा वळला. अद्यापि तोच एक मारातून वाचला होता. आम्ही नऊच्या नऊ जण आपापल्या जागेवर पुतळ्यासारखे बसलो होतो. कामावर गेलेल्यांपैकी एकही इसम परतला नव्हता. कोणीही बोलत नव्हतं–पूर्ण स्तब्धता, माझा घसा कोरडा पडला होता. मी विचार करू लागलो, 'या परिस्थितीचा फायदा घेऊन त्यांनी मला गोळी घालायची संधी घेतली नाही म्हणजे सुटलो. नाही तरी ते टपलेच आहेत.'

'ते आले,' कारबोनेरी म्हणाला. भीतीमुळे तो मृतवत् झाला होता.

वीसजण एकदम आत घुसले. हातात बंदुका किंवा पिस्तुलं सज्ज होती. 'कमाल आहे,' फिलिसारी किंचाळला, 'अजून तुम्ही कपडे काढले नाहीत? डुकरांनो, तुम्ही कशाची वाट पाहत आहात? आम्ही एकालाही जिवंत सोडणार नाही. सोडा विजारी! तुमच्या प्रेतांसह कपडे वाहून न्यायची आमची इच्छा नाही.'

'फिलिसारीमहाशय...'

'थोबाड बंद कर, पॅपिलॉन! क्षमा मागण्याचं नाटक नको. तुमची योजना अत्यंत राक्षसी होती आणि या ब्लॉकमधल्या साऱ्यांचा त्यात हात होता–संशयच नाही!' त्याचे डोळे रागानं बाहेर पडतात की काय असं वाटत होतं. त्यांच्या लालबुंद डोळ्यांमधून खून डोकावत होता.



## प्रकरण एकवीस : बंड फसले

'संपलं सारं.' पायरट म्हणाला.

अखेरचा प्रयत्न म्हणून मी एक डाव टाकला. 'तुमच्यासारखा विचारी माणूस निरपराध लोकांना खरोखर ठार करणार हे पाहून आश्चर्य वाटतं. तुम्ही गोळ्या घालणार आहात ना? उत्तम. मग आता उगीच व्याख्यानं नको. झाडा गोळ्या; पण कृपा करून वेळ दवडू नका! फिलिसारीसाहेब, तुमच्याविषयी माझ्या काही वेगळ्या कल्पना होत्या, पण आता इलाज काय? माझी समजूत चुकीची ठरली. तुम्हाला गोळ्या झाडताना बघायची सुद्धा माझी इच्छा नाही, म्हणून मी पाठ फिरवतो. मित्रांनो, तुम्ही सुद्धा पाठी वळवा, म्हणजे त्यांना असं म्हणायची संधी द्यायला नको की आपण त्यांच्यावर हल्ला करत होतो.'

सैनिकी थाटानं सर्वांनी एकदम अबाउट टर्न केलं. माझ्या या कृतीमुळे पहारेकरी विस्मितच झाले. फिलिसारीसुद्धा थबकला.

'आणखी काही सांगायचं राहिलंय् का पॅपिलॉन?'

पाठ वळवलेल्या स्थितीतच मी म्हणालो, 'असल्या बंडावर माझा मुळीच विश्वास नाही. कशासाठी हे बंड? पहारेकऱ्यांना ठार करण्यासाठी? आणि नंतर पळून जाण्यासाठी? पण कुठे जाता येईल? मी एकदा पळून गेलो होतो आणि कोलंबियाहून हजारएक मैलांवरून परत इथे आलेलो आहे. या खुनी लोकांना कुठला देश आश्रय देईल? मी विचारतो, त्या देशाचं नाव तरी सांगा! सगळा मूर्खपणा आहे—आमच्यातला एकही माणूस असल्या योजनेत सामील होण्याइतका गाढव नाही!'

'तू कदाचित नसशील, पण कारबोनेरीचं काय? माझी खात्री आहे की त्याचा यात नक्कीच हात आहे. कारण आज आजारी असल्याचं सांगून तो कामावर गेला नाही. तेव्हा आरनॉड आणि हाउतिनला खूप आश्चर्य वाटलं होतं.'

'तो केवळ योगायोग होता, विश्वास ठेवा!' पुन्हा वळून त्याच्याकडे पाहत मी म्हणालो, 'कारबोनेरी माझा चांगला मित्र आहे.

माझ्या आधीच्या सुटकेविषयी त्याला शब्दन् शब्द ठाऊक आहे. भ्रामक योजनांवर तो कधीही विचार करणार नाही–बंडानंतर सुटकेचा शेवट काय होईल हे का त्याला कळत नाही ?'

याच वेळेला तिथे गव्हर्नर आला. दाराबाहेरच उभा राहून त्यानं फिलिसारीला बोलावलं. 'कारबोनेरी.'

'हजर.'

'याला न मारता अंधारकोठडीकडे न्या. सर्वजण बाहेर या. इथे फक्त मुख्य वॉर्डर लोकांनी थांबावं. सगळीकडे विखुरलेल्या कैद्यांना परत घेऊन या. कोणालाही ठार करू नका. प्रत्येकजण कॅम्पवर हजर पाहिजे !'

नंतर गव्हर्नरनं हॉलमध्ये प्रवेश केला. सोबत डेप्युटी, फिलिसारी आणि चार रक्षक होतेच. 'पॅपिलॉन, नुकताच मोठा गंभीर प्रकार घडलाय्,' तो म्हणाला. 'गव्हर्नर या नात्यानं माझ्यावर मोठीच जबाबदारी आहे. काही निर्णय घेण्यापूर्वी मला थोडी माहिती हवी आहे. माझ्याशी एकांतात बोलायला सध्याच्या तंग वातावरणामुळे तू नकार दिला असतास हे मला ठाऊक होतं, म्हणूनच मी स्वत: इथे आलो आहे. डुक्लॉस वॉर्डरचा खून झालेला आहे. आमच्या घरीसुद्धा तोच प्रयत्न झाला, याचा अर्थ बंड हाच होतो. मला थोडाच वेळ आहे. तुझ्यावर माझा विश्वास आहे. तुझं याबाबतचं मत काय आहे ?'

'बंड झालंच असेल तर आम्हाला त्याचा पत्ता कसा नव्हता ? आमच्यापाशी कोणीच त्याबद्दल कसं बोललं नाही ? त्यात कितीजण सहभागी झाले आहेत ? गव्हर्नरसाहेब, या तिन्ही प्रश्नांची उत्तरं मी देईन, पण मला फक्त एकच सांगा, वॉर्डरला ठार केल्यावर कितीजणांनी पळायचा प्रयत्न केला ?'

'तीन.'

'कोण कोण ?'

'आरनॉड, हाउतिन आणि मार्क्यू.'

'आता माझ्या लक्षात आलं. तुम्ही काहीही म्हणा, झालं ते बंड नव्हतं.'

'तू खोटं बोलतोय्स्, पॅपिलॉन,' फिलिसारी फिसकारला. 'हे बंड खरं तर रॉयेलवरच घडून येणार होतं. गिरासोलो त्यातून फुटला होता, पण आमचा त्याच्यावर विश्वास बसला नाही. आता त्याचं म्हणणं खरं असल्याचं ध्यानात येतंय्. तू चक्क डबल-क्रॉस करतो आहेस !'

'तुमचं म्हणणं खरं मानलं तर मी, कारबोनेरी, पायरट, गाल्गानी इ. खास लोक अलिप्त कसे राहू ? काहीही घडलं असलं तरी माझा त्यावर विश्वास नाही. बंड व्हायचंच असतं तर त्याचे सूत्रधार आम्ही झालो असतो, दुसरे कुणीही नाही !'

'म्हणजे तुला म्हणायचंय् तरी काय ? दुसऱ्या कोणाचाही त्यात हात नव्हता ? अगदी अशक्य !'

'मग सारे बंडवाले आहेत कुठे ? त्या तीन वेड्यांखेरीज कोणी हालचाल केली आहे ? या हॉलचा ताबा घेण्याच्या दृष्टीनं एक तरी पाऊल टाकलं गेलं का ? तरी इथे फिलिसारीखेरीज फक्त चारच रक्षक आहेत आणि सेंट जोसेफवर होड्या किती आहेत ? फक्त एक. सहाशे लोकांसाठी एक होडी–कोणाला तरी पटेल का ? आम्ही काही साधुपुरुष नाही. त्या होडीसाठी एकमेकांतच मारामारी झाली असती. अशी सुटका कधी तरी यशस्वी होईल का ? आणि समजा वीसएक जण त्यातून पळाले असते तरी त्यांना कोणत्याही देशानं पुन्हा परत ताब्यात दिलंच असतं. साहेब, तुम्ही किंवा तुमच्या माणसांनी किती जणांना ठार केलं आहे ते मला ठाऊक नाही, पण ते सगळे निर्दोषी होते अशी माझी जवळजवळ खात्रीच आहे आणि आमच्या जवळच्या सर्व चीजवस्तू नष्ट करण्यात तरी काय अर्थ होता ? तुम्हाला राग येणं साहजिक आहे, पण एक लक्षात ठेवा ! ज्या दिवशी कैद्यांच्या आनंदाच्या सर्व गोष्टी हिरावून घेतल्या जातील तो दिवस मात्र बंडाचा नक्कीच असणार ! भडकलेल्या, निराश झालेल्या लोकांचं जिवाच्या आकांतानं होणारं बंड ! केवळ खुनांसाठी खून, सामुदायिक आत्महत्या, मग सगळे कैदी आणि बरोबर सर्व पहारेकरी ठार झाले तरी बेहेत्तर ! मिस्टर ड्यूटेन, मी अत्यंत प्रामाणिकपणे बोलत आहे तेही तुम्ही इथे आलात आणि मला विचारलंत म्हणून–कोणताही निर्णय घेण्यापूर्वी. आता आम्हाला स्वस्थ बसू द्या !'

'आणि कटात सहभागी झालेल्यांचं काय ?' फिलिसारी पुन्हा म्हणाला.

'त्यांना शोधून काढायचं काम तुमचं आहे. आम्हाला त्याबाबत काहीही माहिती नाही. आमच्याकडून तुम्ही कोणतीही अपेक्षा बाळगू नका. मी पुन्हा सांगतो की, झाला प्रकार म्हणजे दोन–चारजणांचा वेडाचार होता. आम्हाला त्याच्याशी काहीही कर्तव्य नाही !'

'फिलिसारी,' गव्हर्नर म्हणाला, 'या ब्लॉकमधले सगळे लोक परत आले की पुढची आज्ञा मिळेपर्यंत दार बंद ठेवा ! दाराशी दोन वॉर्डर ठेवा. मारहाण किंवा चीजवस्तूचा नाश होता कामा नये. चला !' असं म्हणून तो इतर रक्षकांसह निघून गेला.

'सुटलो. सुटलो. आम्ही सर्वजण सहीसलामत वाचलो.' दार बंद करता करता फिलिसारी म्हणाला, 'मी विचारी आहे. त्यामुळेच तुम्ही नशीबवान ठरलात.'

तासाभरात आमच्या ब्लॉकमधले जवळजवळ सर्वजण परतले. अठराजणांचा पत्ता लागला नव्हता; पण त्यांना घाईघाईनं दुसऱ्याच ठिकाणी कोंडलं असणार ! अखेर सर्वजण जमले. आम्हाला सारा प्रकार कळला. एकान हलक्या आवाजात सांगण्यास सुरुवात केली.

'आम्ही साधारण एक टन वजनाचा गोल दगड चारशे यार्ड ओढत नेला होता, पपी. गव्हर्नरच्या घरापासून पन्नास यार्डांवर असलेल्या विहिरीपाशी विश्रांतीसाठी थांबलो. नेहमी तिथेच थांबतो. तिथे एक तर सावली असते आणि निम्मं अंतर संपलेलं असतं. पाणी पिऊन दहा मिनिटांत आम्ही उठलो. आज पहारेकरीही रोजच्यासारखा हेल्मेट काढून विहिरीच्या काठावर बसला. तो घाम पुसत होता. इतक्यात मागून आरनॉड तलवार घेऊन तिथे पोचला. ती खाली असल्यामुळे कोणालाच दिसली नाही. म्हणून रक्षकाला सावधही करता आलं नाही. आरनॉडनं एका घावात त्याच्या डोक्याची दोन शकलं केली. आवाज न करता तो खाली कोसळला. हाऊतिन जवळच उभा होता. त्यानं पहारेकऱ्याचं पिस्तूल काढून घेतलं, मार्क्यूनं त्याचा पट्टा घेतला आणि सर्वांना उद्देशून तो म्हणाला, 'ही बंडाची सुरुवात आहे. आमच्याबरोबर ज्यांना यायचं असेल त्यांनी यावं !'

एकही तुर्की किंवा आमच्यापैकी जागचा हलला नाही किंवा शब्दही बोलला नाही. पुन्हा तो ओरडला, 'भेकडांनो, आम्ही आमचं पाणी तुम्हाला दाखवतो!' आणि दोघंजण गव्हर्नरच्या घराकडे धावले. मारक्यू तिथेच थांबला. 'हालचाल करू नका, बोलू नका आणि ओरडूही नका. तुम्ही सगळे अरब, जमिनीकडे तोंड करा!' मी बसलो होतो तिथून सगळा प्रकार स्पष्ट दिसत होता.

'आरनॉड गव्हर्नरच्या घराच्या पायऱ्या चढताना दिसला. त्याच वेळी घरगडी अरब दोन मुलींना घेऊन बाहेर पडत होता. एक कडेवर आणि दुसरी हाताशी. तो एकदम बेसावध होता. आरनॉड त्याला गोळी घालणार इतक्यात अरबानं मुलीला ढालीसारखं पुढं धरलं. हाऊतिननं वर न चढता त्याचा पाय ओढला. अरब खाली पडणारच होता. तेवढ्यात त्यानं एक मूल आरनॉडच्या पिस्तुलाच्या दिशेनं फेकलं. आरनॉड, लहान मुलगी, अरब सगळे खाली कोसळले. पिस्तूल दूर उडालं. तिघेही त्याचा ताबा घेण्यासाठी धावले. त्या वेळी प्रथम मुलगी किंचाळली, नंतर अरब. हाऊतिन–आरनॉड त्यांना शिव्या देऊ लागले.

इतक्यात पहिली गोळी सुटली. जवळच्या एका रक्षकानं ती झाडली होती. मुलींचा आवाज ऐकून गव्हर्नरही खिडकीत आला आणि एकामागून एक गोळ्या झाडू लागला; पण अरबाला त्या लागतील या भीतीनं पिस्तूल जिथे पडलं होतं त्या दिशेला तो झाडत होता. हाऊतिन आणि आरनॉड धावू लागले. त्यांनी समुद्राची दिशा घेतली. हाऊतिन मागे पडला. आरनॉड कृत्रिम तलावापर्यंत पोचला आणि त्यानं मोठ्या दगडाचा आश्रय घेतला. गोळ्या सुटतच होत्या. तोपर्यंत दुसरा वॉर्डर दाखल झाला होता!

'शरण ये!' पहारेकरी ओरडला, 'म्हणजे तुझे प्राण वाचतील.'

'कदापि नाही.' आरनॉड, 'मला एक वेळ शार्क माशांनी खाल्लं तरी चालेल; पण यापुढे तुमच्यासारख्या जनावरांत राहायची माझी बिलकुल इच्छा नाही.'

'आणि तो सरळ शार्क माशांच्या दिशेला पाण्यातून चालू लागला. त्याला गोळीही लागली असावी. कारण एकदा तो थबकला. पुन्हा पुढे जाणं चालूच ठेवलं. छातीपर्यंत पाणी आलं आणि माशांनी त्याला गाठलं. पाण्यावर उसळी मारून ते हल्ला करीत होते. पाच मिनिटांच्या आत त्याचा फन्ना उडाला. पहारेकऱ्यांनी शंभराच्या वर गोळ्या झाडल्या; पण फक्त एकच शार्क मासा ठार झाला.

'तोपर्यंत सर्व दिशांनी पहारेकरी जमा झाले. मारक्यूला वाटलं की, विहिरीत पिस्तूल फेकून देऊन शरण आलं की जीव वाचेल. पण तोपर्यंत अरब उठले आणि त्याला लाथांनी ढकलत रक्षकांपुढे टाकलं आणि त्याचा बंडात भाग होता हे सांगून टाकलं. त्याच्या शरीरावर गोळ्यांचा पाऊस पडला. तरीही त्याच्या डोक्यात एकानं बंदुकीचं बायोनेट खुपसलं. हाऊतिनवरही असाच गोळ्यांचा वर्षाव झाला. अरब लोकांनी आणखी ज्या दोघांकडे बोट दाखवलं त्यांच्यावर फिलिसारीनं गोळ्या झाडल्या. बंडाचं जाहीर झाल्यावर ते दोघं म्हणे क्षणभर उठले होते. त्याविरुद्ध कोणाला बोलताही आलं नाही. सगळे चूप बसून होतो.'

उठावाची परिणती अशी झाली.

आम्हाला दोन दिवस हॉलमधे कोंडून ठेवलं होतं. कामाला कोणीही बाहेर पडलं नाही. दोन-दोन तासांनी पहारे बदलत होते. बोलणं बंद. खिडकीत उभं राहणंदेखील बंद. रॉयेलहून पहारेकऱ्यांची जादा कुमक दाखल झाली. खिडकीतून ते सारखे आत डोकावून पाहात. पहारेकरी तयारीत उभे होते. बंदुका सज्ज!

आम्ही पाच-पाचजणांनी जुगार खेळायचं ठरवलं. मारकेटीनं व्हॉयोलिन वाजवायला सुरुवात केली; पण त्यांनी त्याला गप्प केलं.

'वाजवणं एकदम थांबव! आम्ही सर्व पहारेकरी दुःखात आहोत.'

आमच्या ब्लॉकमधेच नाही तर सर्व कॅम्पमधे असह्य ताण पसरला होता, हे आम्हाला नवीन होतं. कॉफी नाही, सूप नाही. सकाळी ब्रेडचा तुकडा, दुपारी आणि रात्री बीफ. चारजणांत एक डबा. आमच्या ब्लॉकमधील वस्तू नष्ट केल्या नसल्यामुळे कॉफी, लोणी, तेल, पीठ इ. पदार्थ शिल्लक होते. इतर ठिकाणी त्यांचा कणही नव्हता. आमच्या हॉलच्या मुतारीतून जेव्हा धूर बाहेर पडू लागला तेव्हा बाहेरून रक्षकांनी ओरडून तो विझवायला सांगितला. निस्टन नावाचा म्हातारा कैदी कॉफी बनवीत होता. त्यानं ओरडून उत्तर दिलं, 'तुम्हाला गोळ्या घालायच्या असल्या तर खुशाल आत या आणि घाला बरं, मित्रांनो!'

खरंच त्यांनी खिडकीतून गोळ्या झाडल्या. अग्नि विखुरला आणि कॉफी इतस्ततः सांडली.

निस्टनच्या पायात गोळी घुसली. बाहेरचे सगळेजण इतके चिडले होते की आम्हाला वाटलं आता धडगत नाही. आम्ही भुईसपाट पडलो. फिलिसरी तिथे परत येईपर्यंत तसेच पडून राहिलो- गोळ्यांचे आवाज ऐकून तो धावत आला आणि चौकशी केली. कारण कळताच त्यानं गोळ्या झाडणाऱ्याला कॉर्सिकनमधे खूप शिव्या दिल्या. त्या त्या बिचाऱ्याला कळल्याच नाहीत. तो फक्त एवढंच म्हणाला, 'तुझं बोलणं मला काही समजत नाही.'

आम्ही आपापल्या बिछान्यावर परत जाऊन बसलो. निस्टनच्या पायातून रक्त येत होतं. 'मी जखमी झालोय् हे बोलू नका: ते मला बाहेर खलास करतील!'

फिलिसारी गजांपाशी आला आणि म्हणाला, 'तुम्ही खुशाल कॉफी बनवा. पुन्हा मघाचाच प्रकार घडणार नाही!'

निस्टनच्या नशिबानं जखम खोल गेली नव्हती. गोळी लगेच निघाली. पाय धुऊन आम्ही त्यावर बँडेज बांधलं.

'पॅपिलॉन, बाहेर ये!' रात्रीचे आठ वाजले होते. अंधार केव्हाच पडला होता. हाक कोणी मारली ते मला समजलं नाही—कदाचित ब्रेटन असावा.

'या रात्रीच्या वेळी मी कशाला बाहेर येऊ? माझं बाहेर काहीच काम नाही.'

'गव्हर्नरनं तुला बोलावलं आहे.'

'मग त्यांनाच इथे यायला सांग. मी बाहेर येणार नाही!'

'तू नकार देतो आहेस?'

'तसं समजा!'

माझ्याभोवती गोल करून सगळे मित्र उभे राहिले. दाराजवळ जाऊन मारकेटी पहारेकऱ्याला म्हणाला, 'गव्हर्नर इथे आल्याशिवाय आम्ही पॅपिलॉनला बाहेर सोडणार नाही!'

'पण खरंच गव्हर्नरसाहेबांनी त्याला बोलावणं पाठवलंय्.'

'त्यांना स्वत:ला यायला काय झालं?'

एक तासानंतर दोन तरुण पहारेकऱ्यांचे समवेत गव्हर्नरच्या घरचा अरब गडी दारात आला. त्याच्यामुळेच बंड रोखले गेलं होतं.

'पॅपिलॉन, मी आलोय्, मोहम्मद. तुला न्यायला आलोय्. साहेबांना तुझी भेट हवीय्. ते इथे येऊ शकत नाहीत!'

मारकेटी म्हणाला, 'त्याच्याजवळ पिस्तूल आहे, पपी!'

एवढं झाल्यावर मी मित्रांचं वर्तुळ सोडून दारापाशी आलो. मोहम्मदच्याजवळ खरोखर पिस्तूल होतं.

'चला,' तो म्हणाला, 'गरज पडली तर मी तुझं रक्षण करीन!' माझा त्यावर बिलकुल विश्वास बसला नाही. 'चल; चल आमच्याबरोबर.'

मी बाहेर पडलो. शेजारून मोहम्मद आणि मागून दोन पहारेकरी. निघताना फिलिसारी म्हणाला, 'पॅपिलॉन, माझ्याविरुद्ध तुझी काही तक्रार नसेल अशी मला आशा आहे.'

'माझी स्वत:चीच काय पण आतल्या कोणाचीच नाही. इतर ठिकाणची मला तरी कल्पना नाही.'

मार्गात ठिकठिकाणी ॲसिटिलीनचे दिवे लावले होते. त्यांचा प्रकाश अत्यंत अपुरा होता. लवकरच एका अत्यंत प्रकाशमान खोलीत आम्ही पोचलो. तिथे रॉयेलचा गव्हर्नर, डे. गव्हर्नर, सेंट जोसेफवरील गव्हर्नरसह सर्व अधिकारी बसले होते. बाहेर रक्षकांच्या पहाऱ्यात चार अरब उभे होते. त्यातल्या दोघांना मी ओळखलं.

'पॅपिलॉन आला आहे,' मोहम्मद म्हणाला.

'गुड इव्हिनिंग, पॅपिलॉन.' सेंट जोसेफचा गव्हर्नर म्हणाला.

'गुड इव्हिनिंग.'

'बस. ती खुर्ची घे!'

मी सर्वांकडे तोंड करून बसलो. खोलीचं आतलं दार उघडं होतं. तिथे लिझेटची गॉडमदर–गव्हर्नरची पत्नी–उभी होती. तिनं स्मित करून मला हात केला.

'पॅपिलॉन', रॉयेलचा गव्हर्नर म्हणाला, 'गव्हर्नर डयुटेन तुला एक विश्वासपात्र माणूस समजतात. माझ्यापुरतं सांगायचं, तर तुझ्याविषयी फाइलमध्ये असलेले रिपोर्ट तेवढे मी ओळखतो. त्याप्रमाणे तू धोकादायक ठरतोस. तथापि ते लक्षात न घेता मी डयुटेनच्या शब्दांवर विसंबून राहतो. लवकरच चौकशीसाठी एक कमिशन इथे येणार यात शंका नाही. त्या वेळी सर्व कैद्यांना जबाब द्यावे लागतील. हे तर नक्की आहे की तू आणि तुझ्या काही मित्रांचं कैद्यावर दांडगं वजन आहे. ते तुमच्या शब्दानुसार तंतोतंत वागतील, वागतात. आम्हाला उठावाबद्दलचं तुझं मत काय आहे ते जाणून घ्यायचं आहे आणि शक्यतो तुझ्या आणि इतरही ब्लॉकमधले कैदी कायकाय जबाब देतील याचा अंदाज हवा आहे.'

'मला त्याबाबत काहीही बोलायचं नाही किंवा इतरांनी काय सांगावं यावर मी दडपण आणणार नाही. कमिशन जर खरोखरीच चौकशी करण्यासाठी येणार असेल–तेही सध्याच्या वातावरणात–तर तुमची धडगत नाही एवढं मात्र मी सांगू शकतो.'

'तू बोलतोय्स तरी काय, पॅपिलॉन? मी आणि माझ्या सहकाऱ्यांनी बंड मोडून काढलं आहे.'

'अशा प्रकारे तुम्ही तुमची कातडी वाचवू शकाल; पण रॉयेलवरचे प्रमुख मात्र यात अडकणार!'

'तुझ्या बोलण्याचा अर्थ स्पष्ट कर!' रॉयेलच्या दोन्ही गव्हर्नरांनी उठून विचारलं आणि ते पुन्हा खाली बसले.

'तुम्ही जर बंडाविषयी गंभीरपणे आणि ऑफिशियली बोलणार असाल तर सगळे गोत्यात याल! माझ्या काही अटी जर तुम्ही मान्य केल्यात तर मी तुम्हा सर्वांना वाचवीन–फक्त फिलिसारी सोडून!'

'कोणत्या अटी?'

'पहिली: उद्या सकाळपासून इथलं जीवन पुन्हा पहिल्यासारखं सुरळीत व्हायला पाहिजे. मोकळ्या वातावरणातच चौकशीचे वेळी मोकळेपणानं काही बोलता येईल. मला तसं वजन खर्च करता येईल. बरोबर का चूक?'

'बरोबर!' डयुटेन म्हणाला, 'पण आम्हाला वाचवण्याचा अर्थ काय?'

'रॉयेलच्या दोन्ही गव्हर्नरांचा सर्व बेटांवर अधिकार चालतो हे खरं ना?'

'होय.'

'मग, गिरासोलोनं चुगली केली. तेव्हा हाऊतिन आणि आरनॉड हे त्यात पुढारी होते हे तुम्हाला समजलं होतं.'

'कारबोनेरी सुद्धा.' एक पहारेकरी मधेच बोलला.

'नाही, ते खरं नाही. त्याच्याशी गिरासोलोचं मार्सेलिसपासून वैयक्तिक वैर होतं: म्हणून त्यानं सूड घेण्यासाठी त्याला उगीच गोवलं आहे. तुमचा त्या वेळी बंडावर विश्वास बसला नाही. का बरं? कारण त्यानं तुम्हाला सांगितलं की बायका-मुले, पहारेकरी, अधिकारी आणि अरब या सगळ्यांना ठार करण्याचा उद्देश आहे–यावर तुमचा विश्वास कसा बसणार? शिवाय रॉयेलवर दोन आणि सेंट जोसेफवर एकच अशा होडया असल्यामुळे कोणीही शहाणा कैदी बंडात भाग घेणार नाही अशी तुमची समजूत होती.'

'हे सगळं तुला कसं समजलं?'

'तो माझा प्रश्न आहे. पण तुम्ही बंडाविषयी बोलू लागला की


पुरंदऱ्यांचा सरकारवाडा

लेखक
ब. मो. पुरंदरे

मूल्य : सात रुपये
राजहंस प्रकाशन, पुणे ३०

या सगळ्या गोष्टी बाहेर येणार आणि सिद्धही होणार. तुम्ही मला नाहीसं केलंत तरी–तसं झालं तर नक्कीच सगळ्या गोष्टी उघडकीस येतील. म्हणून सगळी जबाबदारी रॉयेलवर पडते. संशयित लोकांना सेंट जोसेफवर पाठवलं खरं; पण त्यांना विभक्त केलं नाही तर एकाच ठिकाणी ठेवलं गेलं. एकाला डेव्हिल बेटावर आणि एकाला जोसेफवर पाठवायचा निर्णय घ्यायला हवा होता. तुम्हाला समजलेली वार्ता विश्वास न बसण्यासारखी होती, म्हणून कमिशनतर्फे जास्त शिक्षाही मिळणार नाही, यात संशय नाही; पण बंड, बंड असा आरडाओरडा कराल तर स्वतःच्या शब्दांनीच तुम्ही आपणहोऊन त्यात फसाल! म्हणून माझ्या अटी मान्य करा ! पहिली मी सांगितलीच आहे, उद्यापासून सर्व काही पाहिल्यासारखं सुरू व्हायला पाहिजे. दुसरी अट : संशयावरून ज्यांना ज्यांना कोठडीत डांबलेलं आहे त्यांची तावडतोब मुक्तता व्हावी. आणि त्यांची चौकशीही स्थगित व्हावी. कारण 'बंड मुळी झालेलंच नाही !' तिसरी गोष्ट : फिलिसारीला या क्षणी रॉयेलवर पाठवण्यात यावं. ते एक तर त्याच्या स्वतःच्या सुरक्षिततेसाठी. कारण बंड जर अस्तित्वात नसेल तर त्या तीन ठार झालेल्या लोकांबद्दल स्पष्टीकरण काय देणार? दुसरं असं की तो खुनशीच इसम आहे. आमच्या ब्लॉकमधल्या एकजात सर्वांना तो ठार करायला निघाला होता. या अटी जर मान्य असतील तर सगळेजण असं म्हणण्याची मी व्यवस्था करीन : आरनॉड, हाऊतिन आणि मारक्यू या तिघांनी प्रचंड गोंधळ घातला आणि ठार होण्यापूर्वी पहारेकऱ्यांना खूपच उपद्रव दिला. ते काय करणार होते ते आधी समजणं शक्यच नव्हतं. कोणी साथीदारही नसल्यामुळे ते कोणाशी बोलले नाहीत.

'आमचे सगळे मित्र असं सांगतील की त्या तिघांनी आत्महत्या करायचा निर्णय घेतला होता म्हणून मरण्यापूर्वी जमतील तितक्या लोकांना ठार करावं असं त्यांनी ठरवलं. तेव्हा, तुमची इच्छा असेल तर, मी थोडा वेळ आतल्या स्वयंपाकघरात जातो. मला उत्तर देण्यासाठी तुम्हाला विचार करायचा असेल तर करू शकता !'

मी आत जाऊन दार बंद केलं. गव्हर्नरच्या पत्नीनं मला हात धरून बसवलं. कॉफी आणि ब्रॅन्डी दिली. मोहम्मद म्हणाला, 'तू माझ्याविषयी एक शब्दसुद्धा बोलला नाहीस ? '

'ते गव्हर्नरचं काम आहे. त्यानं तुला पिस्तूल दिलं याचा अर्थ तुला घाबरायचं काही कारण नाही. कैद्याला शस्त्र देता येत नाही.'

'पॅपिलॉन, मी सगळं बोलणं ऐकलं. तू आमची बाजू घेतलीस हे खरं ना ? रॉयेलवरच्या लोकांना सगळं आमच्यावर ढकलायचं होतं.' गव्हर्नरची बायको म्हणाली.

'हॉं, हॉं. त्यांना तसं करून तर पाहू दे. तुम्ही मुळीच काळजी करू नका ! '

दार उघडलं गेलं. 'पॅपिलॉन, बाहेर ये ! ' एक पहारेकरी म्हणाला.

'बैस, पॅपिलॉन! ' रॉयेलचा गव्हर्नर म्हणाला, ' आम्ही सर्व बाजूंनी विचार केला आणि सगळ्यांचं एकमत झालेलं आहे की तुझं म्हणणं रास्त आहे. बंड मुळात घडलेलच नाही. तिघांच्या माथेफिरूपणामुळे सर्व अनर्थ झाला. म्हणून उद्यापासून सगळे व्यवहार पहिल्यासारखे सुरू होतील. फिलिसारीची आज रात्रीलाच रॉयेल बेटावर बदली करण्यात येत आहे. त्याच्याविषयी आम्ही योग्य तो निर्णय घेऊ. त्यात तुझी ढवळाढवळ नको. आता तूही तुझा शब्द पाळशील असं आम्ही समजतो.'

'तुम्ही निश्चित असा. गुडबाय् ! '

'मोहम्मद, पॅपिलॉनला परत घेऊन जा आणि फिलिसारीला घेऊन या. तो आमच्याबरोबर रॉयेलला येणार आहे.'

आम्ही निघालो. माझ्या सगळ्या बोलण्यावर जरी त्यांचा विश्वास बसला नव्हता तरी त्यांना दुसरा पर्यायच नव्हता. मी शब्द दिल्याप्रमाणे सर्वजण बोलणार होते आणि एखादा कैदी त्याविरुद्ध बोलला तरीही काही बिघडणार नव्हतं.

दुसऱ्या दिवशी सकाळी सात वाजता सर्व शिक्षा-कोठड्या रिकाम्या झाल्या. त्यात सुमारे एकशेवीस लोक अडकवले होते. कामाला कोणीही गेलं नाही. सर्व ब्लॉक्स् उघडे होते. कैदी मन मानेल तसं मुक्तपणे फिरत होते, गप्पा मारीत होते आणि धूम्रपानही करत होते. निस्टनला रुग्णालयात हलवलं.

आता आम्ही सर्वजण एकत्र आल्यामुळे प्रत्यक्षात काय घडलं हे सर्वांना व्यवस्थित समजलं. फिलिसारीनं फक्त एकालाच मारलं होतं. बाकीचे दोघे इतर दोन पहारेकऱ्यांच्या हातून ठार झाले होते. बिचाऱ्यांना असं वाटलं होते की आपल्याला ते ठार करणार; एक निष्फळ प्रयत्न म्हणून दोघांनी पहारेकऱ्यांना धमकी दिली आणि प्राणास मुकले. बंड सुरुवातीलाच फसल आणि तुरुंगाधिकाऱ्यांचं आणि सर्व कैद्यांचं एकमत झालं हे विशेष ! सगळ्या प्रकरणाला आश्चर्यकारक कलाटणी मिळाली. एक आख्यायिका किंवा सत्यकथा म्हणून पुढे त्याची चर्चा होत असेल. दोन्हीतील नक्की काय ते मलाही सांगता येत नाही.

अखेर चौकशीकमिशन आलंच. पाच दिवस सेंट जोसेफवर आणि दोन दिवस रॉयेलवर त्यांचा मुक्काम होता. मी इतरांसारखाच त्यांच्यासमोर जबानी देण्यासाठी गेलो. गव्हर्नरच्या सांगण्याप्रमाणे त्या वेळी सर्व काही ठीक पार पडलं. फिलिसारीला निवृत्तिपूर्व रजेवर पाठवण्यात आलं; म्हणजे तो परत येणारच नव्हता. मोहम्मदला राहिलेली शिक्षा माफ करण्यात आली. गव्हर्नर डचुटेनला खास एक


## साप्ताहिक माणूस : वर्गणीचे नवे दर

वार्षिक : छत्तीस रुपये

सहामाही : वीस रुपये

परदेश : (जलमार्गे)

पंचावन्न रुपये

जादा पट्टी बहाल करण्यात आली.

काही झालं तरी रडणारे लोक असतातच. काल मला एकानं विचारलं, की 'अधिकाऱ्यांशी समेट करून आपला काय फायदा झाला ? '

मी त्याला एवढंच उत्तर दिलं, ' काही विशेष नाही. फक्त पन्नास-साठ जणांचा पाच वर्षांचा एकांतवास वाचला. हे काही फार नाही, हो ना मित्रा ? '

ते वादळ समाप्त झालं. सगळ्यांच्या सर्व गुन्ह्यांवर पांघरूण घातलं गेलं. कमिशनला तेच हवं होतं.-सर्व गोष्टी शांततेत पार पडल्या.

माझा फायदाही झाला नाही की तोटा. फक्त कडक शिक्षा आणि कडक शिस्तीतून बचावल्यामुळं मित्रमंडळीत माझ्याविषयी आदर वाढला इतकंच. काही काही कष्टांची कामं अधिकाऱ्यांनी बंद केली. कारबोनेरीला बेकरीचं काम मिळालं. मी रॉयेलवर परत जाण्याच्या प्रयत्नात होतो; कारण सेंट जोसेफवर वर्कशॉप नसल्यामुळे पुन्हा तराफा बनवणं अशक्य होतं.

फ्रान्समध्ये राजकीय स्थित्यंतरं होऊ पाहत होती; पण बेटावर रेडिओ नसल्यामुळे आम्हाला वार्ता कळत नव्हत्या. जहाजावरून उडत उडत यायच्या तेवढ्याच कळायच्या. युद्धाला सुरुवात होत होती. जर्मनीनं एव्हाना फ्रान्सचा ताबा घेतला असणार.

एक मजेशीर घटना घडली. ' रॉयेलवर एक पाद्री आला आणि त्यानं सर्वांना उद्देशून प्रवचन दिलं. तो म्हणाला, ' जर या बेटांवर हल्ला झाला तर तुम्हाला शस्त्रास्त्रं देण्यात येतील. त्यायोगे तुम्हाला फ्रेंच भूमीच्या रक्षणासाठी बॉर्डर लोकांना साहाय्य करता येईल. ' अगदी खरं आहे. तो माणूस ' भला ' होता. आमच्याविषयी त्याची काय कल्पना होती कुणास ठाऊक ! कैद्यांनाच त्यांच्या कोठड्यांचं रक्षण करायला सांगायचं ! देव जागा आहे, जन्मठेप भोगताना आम्हाला सर्व काही अनुभवायला मिळालं.

युद्धामुळं आमच्या दृष्टीनं काय बदल झाला तर—पहारेकरी दुप्पट, सर्वकाही दुप्पट झालं; साध्या रक्षकापासून गव्हर्नरपर्यंत संख्या तेवढीच वाढली. इन्स्पेक्टर्स वाढले. ब्रेड कमी मिळू लागला—फक्त चौदा औंस मांसही. थोडक्यात सांगायचं तर फक्त एकच गोष्ट वाढली होती, ती म्हणजे पळून जाण्याबद्दलची शिक्षा—मृत्युदंड ! आरोप असा ठेवायचा ' फ्रान्सच्या शत्रूंना सामील होण्यासाठी पलायन आणि प्रयत्न. '

मी रॉयेलवर जवळजवळ चार महिने होतो. डॉ. जर्मेन गिबर्टशी माझी चांगली दोस्ती झाली होती. त्याची पत्नीही माझ्याशी मित्रत्वानं वागायची. त्यांच्या घराभोवती मी बाग आणि भाजीपाला वाढवला होता. डॉक्टर कुठल्याही बॉर्डरशी हस्तांदोलन करीत नसे, परंतु मी आणि इतर काही कैद्यांना तो मान मिळे.

शेवटी मी जेव्हा पुन्हा स्वतंत्र झालो तेव्हा आमचा नियमित पत्र-व्यवहार होत असे. माझ्या सुटकेबद्दल त्याचं अभिनंदनाचं पत्रही आलं होतं. पुढे तो इंडो-चायनामध्ये एका जखमी माणसाला वाचवताना ठार झाला. सन १९६७ मध्ये मी फ्रान्सला परत आलो तेव्हा त्याच्या पत्नीला भेटावं असं फार वाटत होतं; पण तो विचार मी सोडला. कारण मी तिला एक प्रशस्तिपत्रक मागितलं होतं तेव्हापासून तिनं पत्रव्यवहार थांबवला होता. तिनं ते पाठवून दिलं होतं; पण त्यानंतर तिची वार्ता मला समजली नाही. याचं कारण मला कधीच समजलं नाही; पण त्या दोघांनी मला रॉयेलवर जी वागणूक दिली होती, त्यामुळे त्यांच्याविषयी मला अद्यापही कृतज्ञता वाटते.

रॉयेलवर परत जाण्यासाठी मला सेंट जोसेफवर आणखी काही महिने घालवावे लागले.

[ क्रमशः ]

---

सकाळी सूप वाढण्यापूर्वी एका मोठ्या टबमध्ये ते ठेवलेलं असे. त्या दिवशी मी सरळ चालत टबपर्यंत गेलो; सर्वांच्या देखत त्यात लघवी केली. हॉलमधील वातावरण तंग झालं, परंतु माझा चेहेरा पाहून एकजणही पुढे आला नाही. फक्त ग्रँडेट मला म्हणाला, ' तू हे काय करतोयस ? '

' काय यात मीठ घालायला ते विसरलेत. ' आणि माझं भांडं हातात घेऊन मी सूप मिळण्याची वाट पाहू लागलो. सर्वत्र स्मशानशांतता पसरली होती. एकूण एक कैदी माझ्याकडे वारकाईनं पाहत असताना मी भांड्यातील सूप संपवलं.

थोड्याच वेळात तिथे डॉक्टर दाखल झाला.

' या डॉक्टर, तुम्हाला आता बरं वाटतंय ना ? काय, हो का नाही ? ' त्याच्याकडे कुतूहलपूर्वक बघत मी विचारलं.

' होय, मी ठीक आहे. पण तुझं काय ? तू आजारी आहेस का ? '

' छे, छे. मला काय धाड भरलीय्. मला कळलं होतं की तुम्हीच आजारी आहात. पण तुम्ही ठीक आहात हे पाहून मला बरं वाटलं. गुडबाय् ! '

# पॅपिलॉनला वेडाचा झटका

**पुढील अंकी**

# साप्ताहिक भविष्य

## कृष्ण माईणकर

### १४-६-७५ ते २०-६-७५

**मेष : नव्या युगाची नांदी**

आनंद आणि प्रसन्नता घेऊन हा आठवडा येत आहे. त्याला हसतमुखाने सामोरे जा हाच या आठवड्याचा संदेश आहे. तुमचा स्वभाव अहंकारी आहे. स्वतःकडे सारी सूत्रे असावीत, चार माणसे हाताखाली असावीत, आपण त्यांचा 'साहेब' किंवा 'मालक' असावे असे वाटते. मित्र हो, ही तुमची इच्छा पुरी व्हावी असेच या आठवड्याचे ग्रहमान आहे. फार छान ग्रहमान आहे. अजून काही काळ शनिमहाराज तिसरे आहेत. आप्तइष्ट-मित्र तुमच्यावर खूष आहेत. नातेवाईक तुमच्या कर्तबगारीने सध्या दिपून गेले आहेत. त्यांची स्तुतिस्तोत्रे तुमच्या मनाला समाधान देणार आहेत. तुमची सासरची मंडळी तुमच्यावर नाराज होती; पण तीही आता तुमच्या मदतीला येणार आहेत. तुमचा औद्योगिक व्याप वाढणार आहे. तुम्ही जर कारखानदार, गिरणीमालक असाल किंवा पोलाद, लोखंड अशा उद्योगात तुम्ही नोकरी करीत असाल तर तुम्हाला चांगले दिवस येत आहेत याची खूणगाठ मनाशी बांधा. ध्यानीमनी नसताना या धंद्यात तुम्हाला महत्त्वाचे स्थान प्राप्त होणार आहे. तुमची ऐपत साधारण असेल तर तुमच्या परिस्थिती-प्रमाणे तुम्हाला धंदा सुरू करण्यासाठी भांडवल मिळू शकेल. धंद्यासाठी जागा मिळू शकेल. तुमची शारीरिक स्थिती पूर्ण सुधारली नसली तरी सुधारू लागेल. दवाखाना कमी होऊ लागेल. नोकरीच्या दृष्टीने आठवडा सावधगिरी बाळगायला लावणार आहे. तुमची कसोटी लागेल. पोलीस अगर संरक्षण खात्यात तुम्ही असाल तर तुमच्यावर फार मोठी जबाबदारी पडणार आहे. बेकारांना नुसते आश्वासन मिळेल. महिलांनी वरिष्ठ दर्जाच्या परीक्षा द्याव्यात. त्यांच्या शिक्षणातील अडचणी दूर होतील. शुभराशी ३-७-८.

**वृषभ : कर्तबगारीला वाव मिळेल**

शुक्राच्या वर्चस्वामुळे तुम्ही सतत भावनावश राहता. ही परिस्थिती तुम्ही जर बदलली व मोकळ्या मनाने सर्वत्र संचार केला तर सध्या तुमच्या अपेक्षापूर्तीला आकाश ठेंगणे वाटू लागेल. राशीवर केतू आहे व राहू तुमचे सांसारिक जीवन दूषित करण्याचा प्रयत्न करीत आहे. पण त्याला यश येणार नाही याची खात्री बाळगा. अकरावा गुरू ही तुमची फार मोठी जमेची बाजू आहे. रोज गुरुचरित्र वाचा किंवा शक्यतेनुसार गीता वाचा. त्यामुळे तुमच्या मनावरचे दडपण तर दूर होईलच. पण तुमचे आत्मसामर्थ्य वाढून कोणत्याही परिस्थितीला तुम्ही धाडसाने तोंड देऊ शकाल. सध्याचे ग्रहमान तुमच्या कर्तबगारीला वाव देणारे आहे. सोमवारी कुणाला आश्वासन देऊ नका. बुधवारी लेखी करार करू नका व नोकरीच्या बाबतीत काळजी घ्या. एवढी प्रतिकूलता सोडली तर आठवडा तसा वाईट नाही. तुमचा पिंड उद्योगाचा नाही. सध्या तुमच्या मनात स्वतंत्र उद्योग करावा, किमानपक्षी नोकरी करून काहीतरी करावे असे तुम्हाला वाटत आहे. पण त्या भानगडीत तुम्ही मुळीच पडू नका. एकदम श्रीमंत होण्याचे स्वप्न साकार होणे कठीण आहे. नोकरी करा. मन लावून नोकरी करा. स्वतःच्या कामाशी व मालकाशी प्रामाणिक राहा. त्यातच तुमचा उदय होणार असून त्याचा अनपेक्षित अनुभव या आठवड्यात येईल. एखादी प्रतिष्ठित व्यक्ती ओळखीचा तुम्हाला फायदा करून देईल. तुम्ही नोकरीचे जीवन भोगत असाल तर तुमचे हाल संपले आहेत. कलाक्षेत्रात नोकरीसाठी प्रयत्न करा. जन्माचे कल्याण होऊन जाईल. चालू नोकरीत बदल करू नका. एखाद्या स्त्रीची मदत होईल. महिलांना नव्या कल्पना प्रत्यक्षात आणता येतील. नोकरीत कौतुक होईल. शुभराशी ६-८-१०.

**मिथुन : संघर्षाचे वातावरण**

आठवड्याच्या पहिल्या दोन दिवसांत कौटुंबिक जीवनांत व घरगुती क्षेत्रात काही महत्त्वाच्या घटना घडणार आहेत. दीर्घकालानंतर एखादा तुमचा नातेवाईक "श्रीमंत" होऊन तुमच्या घरी येण्याची शक्यता आहे. दत्त म्हणून मित्राकडून पैशाची मदत येईल. सोमवारनंतर मात्र आठवडा छान आहे. परीक्षांचे निकाल तुमच्या घरांत आनंद निर्माण करतील. तुम्ही स्वतः डिपार्टमेंटल परीक्षा अथवा इंटरव्ह्यू दिला असेल तर त्यांत तुम्ही वरच्या श्रेणीने पास व्हाल. बँकिंग, वकिली, अर्थसंस्था यांत काम करणारे लोक खूष व्हावे असे आर्थिक स्थित्यंतर त्यांच्याबाबतीत घडू शकेल. बेकारांना काम तर मिळेलच; पण त्यांना आवडीचे असेच काही घडू शकेल. मात्र उद्यापासून रवि हा शनीच्या सहवासात येत असल्यामुळे नोकरी व व्यवसाय, स्वतंत्र धंदा वगैरे बाबतीत संघर्ष निर्माण होण्याची शक्यता आहे. तो टाळण्यात तुमच्या कौशल्याची कसोटीच लागणार आहे. मालक किंवा वरिष्ठ अधिकारी यांना हाताखालच्या लोकांकडून मुत्सद्देगिरीचे सर्टिफिकेट मिळणार आहे. कोणत्याहि प्रकारच्या व्यापारी क्षेत्रांत काम करणारे "मुनिमजी", दिवाणजी व सल्लागार यांना पैसे मिळवण्याची उत्तम संधी आहे. महिलांनी शैक्षणिक क्षेत्रांत नोकरी मिळवावी. त्यांना मिळू शकेल. शुभराशी–२-६-७

**कर्क : खर्चावर नियंत्रण ठेवा**

रविवार ते बुधवार पैसे मिळण्याच्या दृष्टीने उत्तम आहेत. तुम्ही लॉटरीचे तिकिट घेतले असेल, तर तुमचे नशीब उघडेल. ज्यांना रेसचा नाद आहे त्यांना या वेळी घबाड मिळेल. आकडे खेळणे कायदेशीर नाही पण असे बेकायदेशीर रीत्या पैसे खेळणाऱ्यांना अकल्पित धनलाभाचा योग आहे. असे असले तरी मित्र हो, असा पैसा मिळवण्याचा मोह टाळावा. कारण तुमचे नशीब बहरले, पैसा मिळाला तरी बारावा रवि-शनि तुमची बचतीची शक्ती एकदम खच्ची करणार आहे. तुमचे स्वतःचे काही असेल तर त्याची चोरी वा मोडतोड होण्याची शक्यता आहे. तब्येतीला भरमसाठ पैसा खर्च करावा लागेल. जुना आजार बळावेल किंवा अकस्मात आजार निर्माण होईल. पण गुरुकृपेने सारे निभावून जाईल. त्याची तुमच्यावर कृपा आहे. या वेळी जागा बदल होईल. स्थलांतराची शक्यता आहे. हा बदल आज त्रासदायक होईल. पण अंतिम हिताचा ठरेल. नोकरीत बदलीची शक्यता आहे. चालू कामात देखील बदल होईल. बेकारांना आश्वासन मिळाले तरी ते प्रत्यक्षात उतरणे कठीण आहे. कापडव्यापारात नफा मिळून धंदा व्यवस्थित चालेल.

आर्थिक हानी भरून निघाली नाही तरी धंद्यातील अडचणी दूर होतील. कलावंताना व लेखकांना हा आठवडा मन:स्थिती अस्वस्थ करणारा जाईल. महिलांची भरतकामे, नोकरीतील कर्तबगारी लोकप्रिय होतील. शुभराशी १–७–८

**सिंह : सांपत्तिक सुधारणेचा शुभारंभ**

अकरावा शनि तुमचे जीवन पिवळे करीत आहेच. त्याच्याच जोडीला आता रवि देखील उद्या येत आहे. आता तुम्हाला काय हवे आहे ? तुमचा पिंड राजकारणी. तुम्ही राजकारण खेळतां त्याऐवजी राजकारणाचा धंदा करा. कारण 'डबोले' मिळवण्याची तुम्हाला नामी संधी येणार आहे. तुम्ही एखाद्या श्रीमंत जमीनदार अगर अशाच व्यक्तीचे व्यवस्थापक असाल तर तुमच्या मनातील हेतू पुरा होणार आहे. जमिनीच्या व्यवहारात भक्कम नफा. औषधाच्या व्यापारात काळाबाजार न करताही पैसा मिळेल. बॅरिस्टर, वकील, न्यायाधीश यांना कायदेशीर मार्गाने पैसे मिळतील. त्यांच्या बुद्धीचे चीज होईल. तुमचे बरेच दिवसांचे परदेशप्रवासाचे स्वप्न साकार होणार आहे. स्वतःचा पैसा खर्च न करता ही वारी घडेल. तांबा, पितळ, अल्युमिनियम, तेलबिया, तेले यात काम करणारे नोकर पगारवाढीचे मानकरी आहेत. बोनस अगर इतर कारणाने त्यांना पैसा मिळू शकेल. नोकरी सरकारी असेल तर त्यांना थोडा त्रास आहे. लाचखोरीचा मोह कटाक्षाने टाळा. कायदेपदवीधर, कृषितज्ज्ञ, संशोधक, विज्ञानपदवीधर यांना सरकारी प्रोत्साहन मिळेल. तिखट टीकालेख लिहिणारे पत्रकार, समीक्षणात्मक लेख लिहीणारे समीक्षक यांच्या लेखणीला भलतेच 'आव्हान' मिळणार आहे. महिलांनी फॅशन्सच्या आहारी न जाणे या वेळी हिताचे ठरेल. तरुणींनी जास्त काळजी घ्यावी. शुभराशी–३–६–७

**कन्या : समाधानकारक वाटचाल**

शनी दहावा ही काही कन्या राशीला तशी वाईट परिस्थिती नाही. शनीबरोबर या आठवड्यात रवीदेखील येत आहे. शनी-रवी शत्रू असले तरी तुम्ही त्याची फिकीर करू नका. जाणीवपूर्वक मनाशी योजना आखा. बेत ठरवा आणि योग्य पावले उचला. एक गोष्ट पक्की लक्षात ठेवा की नोकरी सोडून काही उद्योग करू नका. नोकरी मन लावून करा. स्वतःच्या कामाशी प्रामाणिक राहा. तुमचा उत्कर्ष नोकरीत आहे व त्याची योग्य अशी चाहूल या आठवड्यापासून होईल. गेले काही दिवस वरिष्ठांकडून तुमच्यावर अन्याय चालू आहे. त्याला वाचा या वेळी फुटणार आहे. मालक तुमचे म्हणणे शांतपणाने ऐकून घेतील व तुम्हाला न्याय देण्याच्या दृष्टीने विचार करतील. तुम्ही जर खाजगी नोकरीत असाल तर तुमच्या कामाचे चीज होईल. काही महत्त्वाचा बदल होईल. साईड बिझिनेसच्या दृष्टीने तुम्ही पावले टाकायला हरकत नाही. आजारीपणामुळे तुमचा चालू धंदा जर गारठला असेल तर त्याला पुन्हा ऊब मिळेल. आर्थिक परिस्थितीत सुधारणा होईल. चार पैसे मिळतील. मंगळामुळे तुमच्या कौटुंबिक जीवनात जी कटुता निर्माण झाली आहे ती बदलू शकेल. रविवार, मंगळवार, शुक्रवार नोकरीत समाधान लाभेल. उत्साह वाटेल. महिलांनी स्वतःचा उद्योग सुरू करावा. त्यांना प्रोत्साहन व मदत मिळेल. चालू धंदा सुधारेल. शुभराशी ४–७–८.

**तूळ : व्यवसायाला कलाटणी**

कित्येक दिवसांनी इतके चांगले ग्रहमान तुमच्या वाट्याला आले आहे. खूप हसा, खूप मजा करा, आणि खूप कमवा असेच तुम्हाला या वेळी मला सांगायचे आहे. तुम्ही कवडीचुंबक नसूनही तसे वागता हे बरे नाही. महाशय, पैशाची काळजी कशाला करता ? रवी व शनी यांच्यावर ती जबाबदारी आहे. तुम्हाला रेसचे, लॉटरीच्या तिकिटाचे इतकेच काय बेकायदेशीर असलेल्या मटक्याचे आकडेदेखील या मार्गांनी हे रवी-शनी तुम्हाला पैसा मिळवून देणार आहेत. तुमची आर्थिक कुवत सामान्यातील सामान्य असली तरी आता ती बदलणार आहे. कोणत्याही प्रकारची काळजी करू नका. लेखक, लावणीकार, नाट्यलेखक, चित्रपटलेखक व यातील कलाकार, गायक यांना प्रसिद्धी, कीर्ती व पैसा मिळवून देणारी परिस्थिती आहे. तुमची चैन वाढणार आहे. प्रणयाचे नंदनवन तुमच्यापैकी तरुणतरुणीवर दिसणार आहे. तरुण लोक कर्ज काढून कापड घेतील तर तरुणीवर जीव टाकणाऱ्या तरुणाकडून 'त्याग' म्हणून अशा वस्तू मिळतील. सर्वसामान्यतः आठवडा फार छान आहे. व्यवसायाला कलाटणी मिळावी असे काही तरी घडेल. कापडविक्री, सौंदर्यप्रसाधने व सुगंधी द्रव्ये फर्निचर हे धंदे ऊर्जितावस्था पहातील. नोकरीत अनुकूल बदल होईल. विशेष करून खाजगी नोकरीत समाधान मिळेल. स्त्रीचे मार्गदर्शन व वशिला तुम्हाला मोठा लाभ करून देईल. शुक्रवार व मंगळवार हे तुम्हाला अनुकूल असे वार आहेत. याच दिवशी कोणतेही नवे पाऊल टाका. महिलांचे मनोरथ पुरे होतील. त्यांना प्रयत्नाशिवाय नोकरी मिळू शकेल. कौशल्याचे कौतुक होईल. शुभराशी १–६–१०.

**वृश्चिक : प्रवासात उत्कर्ष**

या क्षणाला गुरु–मंगळाची अद्वितीय शक्ती तुमच्या पाठीशी आहे. हीच तुमच्या वैभवाची एकमेव खूण आहे. गुरु तुमच्या कल्पनेला यशाची जोड देत आहे तर मंगळ यश खेचून आणण्यासाठी तुमच्या ठिकाणी धाडस निर्माण करीत आहे. रवी–शनी तुम्हाला ध्यानी-मनी नसताना प्रवास घडवणार आहे. हा प्रवासदेखील काही फुकट जाणार नाही की अनावश्यक ठरणार नाही. या प्रवासात तुमच्या महत्त्वाच्या व्यक्तींबरोबर सहवास घडेल व या व्यक्ती तुमच्या आगामी जीवनात तुम्हाला उपकारक ठरतील. तुम्हाला मंगळवार हा शुभकारक ठरणारा वार आहे. व या आठवड्यात रविवार, मंगळवार, बुधवार व शुक्रवार हे दिवस महत्त्वाचे आहेत. स्वतंत्ररीत्या एखादा धंदा सुरू करावयास अनुकूलता आहे. जमिनीची खरेदी-विक्री, शेतीमालाची व धान्याची खरेदी-विक्री मेवामिठाईचा धंदा, स्टेशनरी, ॲल्युमिनियम व विद्युतउपकरणे असे धंदे सुरू करा. सध्या असे धंदे चालू असतील तर त्यात उत्कर्ष होईल. फळफळावळ, भाजीपाला असाही उद्योग होऊ शकेल. आर्थिक प्राप्ती सामान्यतः चांगली राहील. पण अनपेक्षित अर्थलाभाच्या तसे आहारी जाऊ नका. निदान या आठवड्यात मटका खेळू नका. पैसे मिळण्यापेक्षा पैसे जाण्याचा योग आहे. नोकरीच्या दृष्टीने सध्या बदल नको. गुरु अनुकूल असला तरी हर्शल अनुकूल नाही. त्यामुळे यश एकदम पदरात पडण्याच्या दृष्टीने सावधगिरी बाळगणे जास्त हिताचे ठरावे. तुमच्यापैकी ज्यांच्या संसारात कटुता निर्माण झाली आहे त्यांच्या संसारात प्रेमाचे

वातावरण निर्माण होईल. अनेकांचे विवाह ठरतील व पार पडतील. महिलांनी कलात्मक गुणांचा विकास करावा. त्यांना प्रतिष्ठा मिळेल. शुभराशी ३–४–७.

### धनु : संधीची वाट पाहा

राशिस्वामी गुरु सुखस्थानी स्वगृही असला तरी सध्या त्याच्यावर मंगळाची छाया आहे. त्यामुळे घरी व बाहेर काही तरी असमाधान देणारी परिस्थिती अजून राहणार आहे. पुढील आठवड्यात मंगळ बदलेल. तोपर्यंत प्रत्येक गोष्ट दमाने घ्या. नोकरीत वरिष्ठांना किंवा हाताखालच्या नोकरांना त्रास होईल असे काहीही करू नका. हाताखालच्या नोकरांना दम भरणे, नोटीस देणे, भावना दुखावणारे शब्द वापरणे शक्यतो टाळा. आपले काम कसे व्यवस्थित करता येईल याकडे जास्त लक्ष द्या. तुमच्या वरिष्ठांच्या अगर मालकांच्या मनात तुमच्याविषयी संशयाचे वातावरण निर्माण होणार आहे. तुमची धोरणे त्यांना पसंत पडणार नाहीत. म्हणून काळजी घ्या. बेकारांच्या नेमणुका थोडा काळ लांबणीवर पडणार आहेत. शेतीपदवीधरांना महत्त्वाचे काम मिळेल. पण सायन्स, वाणिज्य, कला या पदवीधरांना काही सहज मिळेल असे मात्र नाही. लेखक-प्रकाशक यांच्या रेंगाळलेल्या कामांना थोडीफार गती मिळेल. लेखन पुरे होईल. पण प्रसिद्धी लाभायला मात्र थांबावे लागणार आहे. काहींचे स्वीकारलेले साहित्य परत येईल व त्यांना अनपेक्षित निराशा पत्करावी लागेल. पण हा अगदी थोडा काळ आहे. कलावंत, गायक, श्रोत्यांच्या टीकेचे केंद्र बनतील. गायक–गायिकांच्या मैफली गाजतील; पण अर्थप्राप्तीच्या बाबतीत त्यांना आश्वासनभंगाचा अनुभव येईल. नाटककारांची नाटके प्रयोगाच्या तारखा ठरूनदेखील रद्द होण्याची शक्यता आहे. आयत्या वेळी रद्द होतील. शुक्रवार हा तुमचा शुभ दिवस आहे. रविवार, सोमवार व गुरुवार हे महत्त्वाचे दिवस ठरतील. सत्पुरुषाचा आशीर्वाद मिळेल. महिलांनी तीर्थयात्रेची रंगवलेली स्वप्ने साकार होतील. माहेरची मदत मिळेल. शुभराशी ६–७–१०.

### मकर : नव्या योजना साकारतील

मंगळ हा तुमचा मित्र असून सध्या तो तिसरा आहे. या आठवड्याअखेरपर्यंत तो तिसरा राहणार आहे. त्यामुळे तुम्ही तुमच्या नव्या नव्या कल्पना, मनात विचाराधीन असलेल्या योजना याच आठवड्यात पुऱ्या करण्याचे मनात ठरवा. यश आणि धन दोन्ही या वेळी तुमच्या पदरात पडणार आहे. सोमवारी मंत्री अगर अशाच मोठ्या व्यक्तीला भेटायला शुभकारक आहे. मंगळवार ते गुरुवार पैशासंबंधीच्या कामांना गती मिळेल. बँक अगर इतर संस्थांकडून कर्ज मिळवायचे असेल तर प्रयत्न करा. यश मिळू शकेल. आर्थिक परिस्थिती सुधारण्याच्या दृष्टीने मात्र तशी अनुकूलता नाही. राजकारणात तुमचा वरचष्मा राहील. पुन्हा स्थान मिळवाल. निवडणुकीत तुमचा प्रभाव राहील; पण यश फारच थोडे पदरात पडेल. विरोधकांत त्राणच उरणार नाही. तुमच्याविरुद्धची सारी कारस्थाने उधळली जातील. या आठवड्यात प्रवासात मात्र जपावयास हवे. स्वतः वाहन हाकताना डोळ्यांत तेल घालून काळजी घ्या. नवे वाहन खरेदी करण्याची इच्छा पुरी होऊ शकेल. मात्र फार यातायात करावी लागेल. नोकरीच्या दृष्टीने चांगलीच अनुकूलता आहे. मालकांचा कल बघून वागा. जन्माचे कल्याण होईल. तुम्ही स्वतः कारखानदार असाल तर नोकरांचे तुम्हाला या वेळी उत्तम सहकार्य मिळणार आहे. सरकारी नोकरांना या वेळी कामाचा ताण सहन करावा लागणार आहे. बागायतदार व शेतकरी सरकारच्या 'दृष्टीत' असले तरी त्यांना सहानुभूती मिळेल. बेकारांना अनेक मार्गांनी मदत मिळेल. नोकरीत बदलीची शक्यता. महिलांना नोकरीत अधिकाराची जागा मिळेल. दागदागिने घेता येतील. शुभराशी ५–६–९.

### कुंभ : महत्त्वाकांक्षेला प्रतिसाद

तुमच्या अडचणी व मानसिक कोंडी आता इतिहासजमा झालेली आहे. गेले काही दिवस तुम्ही 'अपराधी' मनाने व्यवहारात व तुमच्या सार्वजनिक कार्यात वावरत आहात. ही वृत्ती आता सोडून द्या आणि तुमच्या भोवतालच्या प्रकाशमय वातावरणात समरस व्हा. अनेक दिवस उराशी बाळगलेल्या आशाआकांक्षा सफल होण्याचा समय नजीक आला असून त्याची प्रसादचिन्हे याच आठवड्यात दृष्टिपथात येतील. उद्योग, अधिकारपदे व राजकारण यात तुमच्यापैकी अनेक जण स्थिरावलेले दिसतात. गेले वर्षभर राजकारणात तुमच्याभोवती संशयाचे, अविश्वासाचे जे वातावरण निर्माण झाले होते ते धुके आता विरून जाणार आहे. उद्योगव्यवसायात महत्त्वपूर्ण घटना घडणार असून तुम्ही लोखंडी व पोलादी उद्योग सुरू करा. इंजिनिअरिंग उद्योगाला बरेच अनुकूल वातावरण लाभणार आहे. सायकलफिटर, वर्क्सशॉप्स, मोटारच्या पार्टचा धंदा, फर्निचर, घरबांधणी, तेलगिरण्या अशा उद्योगातील नोकर व मालक संतुष्ट व्हावेत इतकी प्रगती होईल. वीजटंचाईमुळे गेल्या आठवड्यात ज्यांचे नुकसान झाले आहे त्यांना या वेळी फायदा होईल. चालू नोकरीत अडचणी नाहीत पण कामाचा ताण असह्य होणार आहे. संशोधक, विज्ञानपदवीधर, कृषिपदवीधर, बँकिंग धंद्यातील नोकर, कापडगिरण्यातील नोकर, इंजिनिअरिंग उद्योग इत्यादी धंद्यांतील वरिष्ठ अधिकारी, मालक व सर्वसामान्य नोकरवर्ग पैशाच्या परिस्थितीत सुधारतील. प्रकाशक, लेखक व कामगार यांना अनपेक्षित धक्के काही चांगले व काही वाईट धक्के बसतील. मंगळवार ते गुरुवार अनेक प्रकारे लाभ होईल. बेकारांना नोकरी मिळेल. महिलांना राजकारणात व सार्वजनिक कार्यात मानसन्मानाचा योग येईल. शुभराशी ३–७–१०

### मीन : सार्वजनिक गौरवाचा योग

या आठवड्यात सोमवारीच मंगळ-गुरूची युती होत आहे ही तुमच्याबाबतीत एक अतिशय महत्त्वाची घटना मानावी लागेल. गुरूच्या राश्यंतरानंतर तुमची ग्रहदशा अनुकूल वळण घेऊ लागली होतीच. संसारात प्रसन्नता, निर्मळ मनाची माणसे व नोकरीत सौजन्य असे काही तुमच्याबाबतीत घडत आहेच. आता या युतीपासून तुमची प्रतिष्ठा उंचावणार आहे. मानसन्मानाचे योग येणार आहेत. अनेक लाभ व यश तुमच्या दृष्टिपथात अगदी नजीकच्या काळात येणार आहे. गुरु-मंगळाच्या अद्वितीय युतीत अविस्मरणीय अशा घटना घडत असतात. तुम्ही नोकरी करीत असा की एखादा स्वतंत्र व्यापार-धंदा करीत असा; तुम्ही सार्वजनिक सेवा-समाज कार्य करीत असा की राजकारण करीत असा तुमच्याबाबतीत काही तरी गौरवास्पद असे घडणार आहे. नोकरीच्या दृष्टीने जन्मभर केलेल्या कष्टाच्या कामाचे चीज अगदी अनपेक्षितपणे होणार आहे. प्रोफेसर, पत्रकार, लेखक, धर्मगुरू, उत्पादक, साधुसंत, शिक्षक इत्यादी सांस्कृतिक कार्य करणाऱ्यांना लोकप्रियता लाभेल. या राशीचा इतिहास व धर्म असा अभ्यास करणाऱ्यांना शिष्यवृत्ती मिळू शकेल. पाश्चात्यविद्याविभूषित अधिकाऱ्यांना नोकरीत महत्त्वाचे स्थान प्राप्त होईल. अनेकांच्या बाबतीत भोवतालच्या परिस्थितीनुरूप नेतृत्वाचे वरदान लाभणार आहे. या वेळी विवाहेच्छूंच्या गळ्यात 'माला' पडणार आहे. महिलांना सुखस्वास्थ्य व पैसा मिळणार आहे. शुभराशी ७–९–१०. ☐☐

आज रंगभूमीवर आघाडीला असणारा प्रकाश उद्या पडद्यावर हमखास चमकणार !

# प्रकाश इनामदार

रवि गुर्जर

कटचारके कविराजकी शादी है, हम कैसे टाल सकते थे– आनाही पडा।' प्रकाशच्या लग्नाचा स्वागतसमारंभ गेल्या आठवड्यामध्ये मुंबईत झाला. त्या वेळी त्याचा गौरव करताना हिंदी चित्रसृष्टीतील सुविख्यात नट कन्हैयालाल यांनी वरील उद्‌गार काढले. ' कटयार काळजात घुसली 'मध्ये प्रकाश इनामदार काम छान करतो असं न म्हणता जेव्हा ' कविराज बाकेबिहारी 'चं काम छान होतं असं म्हणतात तेव्हा ती भूमिका नि:संशय उत्तम वठली असं समजावं. कन्हैयालालसारख्या जुन्या जाणत्या नटानं कौतुक करावं इनकं यश प्रकाशनं लहान वयात आपल्या गुणांच्या जोरावर नक्कीच मिळवलेलं आहे.

नाट्यसंपदाचं ' कटयार ', नाट्यमंदार-निर्मित ' सौजन्याची ऐशी तैशी ' आणि जसराज थिएटरचं ' एक नार चार बेजार ' या तीन नाटकात तो महत्त्वाच्या भूमिका करीत आहे. ही तीनही नाटके सध्या जोरात चालू आहेत.

**थांबा थोडं, दामटा घोडं**

व्यावसायिक रंगभूमीवरील पहिल्याच नाटकात प्रकाशला मुख्य भूमिका मिळाली. ' कलासंगम ' ही अप्पासाहेब इनामदारांची नाट्यसंस्था. मुक्काम पुणे. अप्पासाहेब म्हणजे प्रकाशचे तीर्थरूप. त्या वेळी त्यांचं ' थांबा थोडं, दामटा घोडं ' जोरात पळत होतं. आपल्या मुलानं शिक्षण पुरं होईपर्यंत नाटकाच्या फंदात पडू नये अशी त्यांची मनापासून इच्छा. शाळेत आणि कॉलेजच्या पहिल्या वर्षामध्ये नकला, एकांकिका, भरत नाट्यमंदिराची बालनाट्ये, रेडिओवरील बालोद्यान, नाट्यवाचन आणि नाटके या विविध प्रकारांमध्ये भाग घेतल्यामुळे आणि अभिनय रक्तातच मुरलेला असल्यामुळे प्रकाशला स्वस्थ बसवेना.

एस्. एस्. सी. झाल्यावर ' सायन्स साईड 'ला नुसतं गेलं की कोणालाही इंजिनियर किंवा डॉक्टर होता येतं अशी पूर्वी आई–वडिलांची आणि विद्यार्थ्यांचीही प्रामाणिक समजूत असे. प्रकाशही असाच पी. डी. सायन्सला गेला. ते वर्ष पदरात पडलं खरं. पण वेळीच त्याच्या लक्षात आलं की ही ' साईड ' आपली नव्हे. मग पुढच्या वर्षी गेला एफ्. वाय्. बी. ए. ला. अभ्यास करण्याची मूळ प्रवृत्ती नसल्यामुळे परीक्षेच्या आधीच त्यानं शिक्षणाला गुडबाय् केलं. एक अखेरचा प्रयत्न म्हणून अप्पासाहेबांनी त्याला फलटण येथे त्याच्या प्राध्यापक भावाकडे शिक्षण पूर्ण करण्यासाठी पाठवलं. पण तिथून हे चिरंजीव एक दिवस पळून पुण्याला आले. पळून जाणारी किंवा येणारी मुलं पुढे चमकतात असा सर्वसाधारण नियम असावा. प्रकाशनं तो खोटा पाडला नाही.

आरडा-ओरडी, भांडाभांडी, रुसवे-फुगवे झाले आणि शेवटी ' थांबा थोडं 'मध्ये त्याला काम देण्यात आलं. त्यातील गजाबा न्हाव्याच्या मुख्य भूमिकेत त्याला भरपूर वाव मिळाला. अपेक्षेहूनही त्याची भूमिका अधिक गाजली. ही गोष्ट जाने. १९६८ ची. तेव्हा प्रकाश होता फक्त अठरा वर्षांचा. लोकनाट्यच होतं ते. महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांत त्याचे अडीचशेच्यावर प्रयोग झाले. आत्मविश्वास होताच, तो स्थिरावला. अनुभव खूप मिळाले. त्या मानानं पुण्या-मुंबईत ' घोड्या 'चे कमी प्रयोग झाल्यामुळे प्रकाशला त्या वेळी जास्त प्रसिद्धी मिळाली नाही. अर्थात नाट्यक्षेत्रातील नामवंत लोकांनी त्याचं खूप कौतुक केलं. या मुलात ' स्पार्क ' आहे हे त्यांनी तेव्हाच ओळखलं.

१९६६–६७ च्या दरम्यान एम्. इ. एस्. कॉलेजतर्फे ' पुरुषोत्तम करंडका 'साठी (महा०कलोपासक) सादर केल्या गेलेल्या ' थीफ पोलिस ' या एकांकिकेमध्ये प्रकाशनं झकास काम केलं होतं. त्या वेळी मी ' माणूस 'मध्येच असं लिहिलं होतं की हा पोरगा नक्की पुढे येणार. ते भविष्य थोड्याच अवधीत खरं ठरलं !

' थांबा थोडं 'नंतर तेवढी प्रभावी आणि त्याच्या गुणांना पुरेपूर वाव देणारी भूमिका प्रकाशला अद्यापी मिळालेली नाही. अपवाद फक्त दोन. एक ' देवाजीने करुणा केली ' आणि दोन ' कटयार.' पहिले नाटक प्रायोगिक असल्याने त्याचे जेमतेम पाच प्रयोग झाले. ' कटयार 'मधील भूमिकेवर शंकर घाणेकरांची छाप असल्यामुळे उत्कृष्ट काम करूनही प्रकाशला पुरेसं समाधान मिळालेलं नाही. अर्थात प्रेक्षक आणि वृत्तपत्रं त्याच्यावर खूष आहेतच.

' कलासंगम 'तर्फे होणाऱ्या शासनाच्या सांस्कृतिक कार्यक्रमांचे अक्षरशः शेकडो प्रयोग झाले. त्यात प्रकाश होताच. त्याची वाणी अत्यंत स्वच्छ आणि शुद्ध आहे ही एक मोठीच देणगी आहे. त्याच्या स्थूल शरिरामुळे ' हीरो 'च्या भूमिका मिळणं कठीण असलं तरी चांगल्या भूमिका मिळण्याबाबत त्याच्यावर अन्याय झालेला नाही. विनोदी भूमिका तो अधिक सहजपणे करू शकतो. थट्टा-विनोद करणे हा त्याचा स्थायीभावच आहे.

**नाट्यव्यवसायावर शिक्कामोर्तब**

आता नाटकाच्या धंद्यातच कायम राहायचं असं जवळजवळ ठरल्यासारखं झालं. इतरत्र भूमिका कराव्यात असं वाटू लागलं. तेवढ्यात ' श्री स्टार्स 'च्या बाबुराव गोखल्यांनी विचारणा केली. बोलणी पक्की होऊन ' वऱ्हाडी मानसं 'मध्ये त्यानं दाजीबाची भूमिका स्वीकारली. त्याशिवाय ' करायला गेलो एक 'मध्ये हरिभाऊ आणि

' स्वयंसिद्धा 'त सोहनभय्या या भूमिकाही त्यानं केल्या. या तिन्ही नाटकांचे एकूण सुमारे १७५ प्रयोग प्रकाशनं केले. यथार्थ प्रसिद्धीही मिळाली.

त्या वेळी ' तो मी नव्हेच 'मध्ये प्रकाशला काम देण्याबाबत प्रभाकर पणशीकर विचार करीत होते. ते अखेर जमलंच नाही. त्यामुळे प्रकाशला वाईट वाटत होतं. लायकी असूनही मुंबईत प्रवेश मिळू नये याचा खेद होणं साहजिकच होतं. ' नाट्यमंदार ' या संस्थेतही काम मिळण्याची शक्यता निर्माण झाली, परंतु तिथे पगारी राहून अन्यत्र काम करण्यास त्या काळी परवानगी नसल्यामुळे तेही फिसकटल.

एक विशेष गोष्ट म्हणजे शंकर घाणेकरांनी त्यावेळी असं भविष्य वर्तवलं होतं की ' आजची परिस्थिती उद्या राहणार नाही, एक दिवस तू या सगळ्यांच्या डोक्यावर बसशील. ' आणि सध्या ( चांगल्या अर्थानं ) प्रकाश खरोखरच सगळ्यांच्या डोक्यावर बसलेला आहे. योगायोगाचा पुढील भाग असा की घाणेकरांच्या निधनानंतर त्यांच्या भूमिकांसाठी प्रकाशचाच विचार केला. घाणेकरांविषयी तो अत्यंत आदरानं बोलतो. या दरम्यान ' वेलभंडार ' नाटकाचे ५० एक प्रयोग त्यानं केले. त्याशिवाय ' वेड लागले राधेला ' या नाटकात दुहेरी भूमिका वठवल्या. मुंबईत प्रवेश केल्याशिवाय आपला खऱ्या अर्थानं विकास होणार नाही हे ओळखून अप्पासाहेबांसह प्रकाश पुणं सोडून दादरला दाखल झाला. सुरुवातीचे काही दिवस त्यांनी ' रवीन्द्र नाट्य मंदिर 'मध्ये काढले मुंबईत लगेच जागा मिळणं कठिणच.

### अखेर मुंबादेवी पावली

घाणेकरांच्या शब्दामुळे प्रकाशला ' लेकुरे उदंड जाली 'मध्ये प्रवेश मिळाला. त्याआधी ' जसराज 'चं ' आतून कीर्तन वरून तमाशा ' नाटक चालू होतं. त्यात त्याला महत्त्वाची खलनायकी ढंगाची भूमिका मिळाली. त्याचे प्रयोगही खूप झाले. दिग्दर्शक दामू केंकरे यांच्याही शिफारसीवरून ' लेकुरे 'मध्ये गोराचं काम मिळालं. या वेळपर्यंत मुंबईत त्याच्या नावाची चर्चा होऊ लागली होती. ' आतून कीर्तन 'मधील भूमिका पाहून विजया मेहेतांनी त्याला ' देवाजीने करुणा केली 'साठी उचलला. उत्तम दिग्दर्शन, मेहेनत आणि भरपूर वाव यामुळे प्रकाशला खरं समाधान मिळालं. तरी त्या नाटकाचे फार प्रयोग होऊ शकले नाहीत.

दरम्यान घाणेकरांचं निधन झालं. ' कटचार 'मधील त्यांची भूमिका घरी चालत आली. घरच्या संगीतमय वातावरणामुळे लय आणि स्वरांचं उपजत ज्ञान होतं. ' बाकेबिहारी 'च्या भूमिकेमुळे वरच्या दर्जाचा नट म्हणून प्रकाशनं गौरव संपादन केला. ' कटचार 'मध्ये तो जेव्हा रागमालिका पेश करतो तेव्हा प्रेक्षकांची उत्स्फूर्त दाद मिळालीच पाहिजे. या वेळी दारव्हेकर मास्तरांच्या कुशल दिग्दर्शनाचा लाभ त्याला मिळाला.

नंतर तो, प्रकाश घांग्रेकर आणि फैय्याज यांच्यासाठी नाट्यसंपदानं खास ' होनाजी बाळा ' निर्माण केलं. त्याचेही ५० एक प्रयोग झाले. आर्थिक दृष्ट्या नाटक फारसं चाललं नाही, पण त्यानं ' बाळा 'ची भूमिका उत्कृष्ट केली. गोवा हिं. अ. च्या ' बिन्हाड-बाजलं ' या नाटकात त्यानं छोटीशी भूमिका केली. नाट्यसंपदानंतर नाट्यमंदारमध्येही शिरकाव झाला. ' जय जगदीश हरे ' या आफळ्यांच्या जुन्या नाटकात घाणेकर काम करणार होते. तथापि नाटक तसंच पडून राहिलं होतं. मग प्रकाशला त्या जागी घेऊन नाटक सुरू झालं. तेही नाटक फारसं चाललं नाही. त्यातील विनोदी ढंगाच्या खलनायकाची त्यानं केलेली भूमिकाही लोकांना आवडली.

सध्या चालू असलेल्या सवनिसांच्या ' सौजन्या– 'मधील भूमिकेला खूप प्रसिद्धी मिळाली आहे. नाटकही जोरात चालू आहे. त्या मानानं ' एक नार चार बेजार 'मध्ये त्याला फारसा वाव नाही, पण ' एका बेजारा 'च्या कामात त्याची चुणूक दिसतेच. ' ही श्रींची इच्छा 'तील सखारामबापूंची भूमिका पहिले ३५–४० प्रयोग तो करीत होता. ती मात्र अगदीच कमी महत्त्वाची होती, निदान तशी लिहिली गेली आहे. असा एकंदर प्रकाशचा नाट्यप्रवास चालू आहे. गेली सात वर्षे तो आघाडीवर आहे. आतापावेतो सुमारे २० नाटकांत त्यानं १००० च्या वर प्रयोगात काम केलेलं आहे. उमेद दांडगी आहे. तो असलेल्या नाटकांच्या जाहिरातीत भूमिकांच्या पहिल्या तीन-चार नावात त्याचं नाव झळकतं. अर्थात याचा त्याला रास्त अभिमान आहे. ज्या भूमिकेमुळे नाव अजरामर होईल–म्हणजेच त्या भूमिकेशी ' प्रकाश इनामदार ' हे नाव निगडित राहील–अशा रोलची तो वाट

पृष्ठ २८ वर




# गेंदवा, नाही फुले

पृष्ठ १२ वरून

मी चाटच पडतो. गेल्या दीड-दोन महिन्यांत मला दररोज दोन-तीन टी. बी. चे पेशंटस् आढळत होते. स्वत: मायक्रोस्कोपखाली पाहिलेले टी. बी. चे लाल जतू माझ्या निदानाला साक्ष नसते तर त्याचं आश्चर्य पाहून मला स्वत:बद्दल शंका आली असती.

इथे सॅनिटेडनचे काय कार्यक्रम करता तुम्ही ?' मी दुसरीकडे चाचपडतो.

'हाँ, बीचबीचमें कोई आ जाता है मॉंगने तो कभी थोडा ब्लीचिंग पाउडर दे देते हैं' त्याचा थंड जबाब !

'दररोज किती पेशंटस् येतात तुमच्याकडे ?' मला कुतूहल.

'येतात दोन-तीन ! सिरीअस केस तर गेल्या वर्षभरात पाहिलीच नाही मी !'

'मग करता काय तुम्ही ?'

'कसा तरी वेळ काढतो यार !'

बी. डी. ओ. वगैरेशी बॅडमिंटन वगैरे खेळतो. आणखी असंच काही.

इ. सी. एफ्. एम्. जी. ची परीक्षा इथल्या नोकरीच्या दरम्यानच त्याने दिली व पासही झालाय. आता अमेरिकेत नोकरीची ऑर्डर मिळण्याची वाट बघतो आहे. तिथं जाऊन साइकीॲट्रीमध्ये स्पेशलायझेशन करण्याची त्याची योजना आहे. मी खिन्न मनाने बाहेर पडतो.

हे डॉक्टर, सरकारी अधिकारी, ही सर्व सुशिक्षित माणसं सभोवतालची परिस्थिती उघड्या डोळ्यांनी बघून त्यापासून प्रेरणा घेण्याऐवजी या जागेला, या कामाला काळ्या पाण्याची सजा मानून आपणच स्वत:ला वटवाघळासारखं उलट टांगून घेतात व ऊर्ध्व लावून बसतात शहराकडे अमेरिकेकडे ! शिक्षण व त्यासोबत येणारी शहरी संस्कृतीची गुलामी त्यांना आपल्याच देशाच्या मातीहून तोडते, वेगळी करते. स्वत:च्याच देशातल्या खेड्यात ते परदेशी होतात, मन ठार बंद करून घेतात व जप करत बसतात आपल्या स्वप्नभूमीचा !

जगदीशची सासुरवाडी इथून पाच-सहा मैलांवरच आहे. त्याची बायको सध्या तिथेच आहे, तीन चार महिन्यांपासून तिला भेटलेला नाही. जाऊ का म्हणून विचारतोय. जा लेका ! खूष रहा.

### गेंदवा नाही फुले

रात्रीच्या अंधारात 'माताजी'चे भक्त जागोजागी चुला पेटवून स्वयंपाक करीत बसले आहेत. बऱ्याच ठिकाणी घोळके गोळा झाले आहेत. गाणं सुरू आहे. एका जागी मीही सामील होतो. पंधरा वीस जण आहेत. चार पाच बाया ! ढोलकं घेऊन आदिवासी गीत सुरू आहे. 'गेंदवा नाही फुले अब जमुना किनारे !' चाल गद्यमयच असली आणि गाणाऱ्यांचा आवाज भसाडाच असला तरी मी इंटरेस्ट घेतो. वा ! काय सांस्कृतिक अभिव्यक्ती आहे ? मी स्वत:ला समजावतो. 'गेंदवा नाही फुले अब जमुना किनारे !' पाच दहा मिनिटे हीच ओळ सुरू आहे. त्याच चालीत, गळा फाडून ते गाताहेत, 'गेंदवा नाही फुले अब जमुना किनारे !' मी 'किनारे'वर मान डोलावतो, पण पुन्हा 'गेंदवा !' मी त्रासून झोपायला जातो.

सकाळी लवकर उठायचा विचार होता. पण शरीर अगदी आंबलंय् ! सहा वाजले ! मी धडपडत उठून बसलो आणि छातीत एकदम धस्स झालं, पुन्हा 'गेंदवा नाही फुले' ऐकून ! रात्रभर ही मंडळी फक्त एकच ओळ गात राहिली ! गेंदवा फुललाच नाही !

मी पटकन तयार होतो. आज आणखी तीस मैल पुढे जायचंय्. जगदीश परतला नाही. हरकत नाही. शेतकऱ्याने बैलाच्या पाठीवर थाप मारावी त्या थाटात सायकलच्या सीटवर थाप मारतो. चल बये ! आता तुझीच सोबत ! थांबून चालणार नाही. गावात गरिबी, अज्ञान, रोग माजले. सावकार, पटवारी, सरकारी अधिकारी मोकाट सुटले. वरून 'माताजी'चा फेरा सुरू आहे. चल ! शेजारचा बिहार पेटलाय्. इथे जंगल पेटलंय्. पळस रागाने तांबडा लाल झालाय्, पावलोपावली निखारे पसरले, पण माणसं थंड आहेत अजून मुडद्यासारखी. कसं होणार ? □

[ सर्वोदय साधना, १६ मे १९७५ या अंकावरून पुनर्मुद्रित ]




# झिलमिल सितारे

# देशी गॉडफादर

( फिरोज खान यांच्या सौजन्यानें )

अरुणा अंतरकर

मारिओ पुझोलिखित आणि मार्लन ब्रँडोअभिनीत ' आणि बहुऑस्कर प्राप्त ' गॉड फादर ' आपल्याला पाहायला मिळणार की नाही म्हणून तुमचा जीव तळमळतो आहे का ? आपल्या सेन्सॉर बोर्डाच्या आणि सरकारच्या धोरणाची नीटशी माहिती नसल्यामुळे– नव्हे नव्हे, पुरेपूर असल्यामुळे या युगातला हा महान चित्रपट आपल्यापर्यंत पोचणारच नाही की काय, या व्यथेनं तर तुम्ही झुरत नाही ? आपण काही कुण्या मंत्र्याचे/राजपत्रभूषित अधिकाऱ्याचे/गेला बाजार एखाद्या हिन्दी निर्मात्याचे दूरदूरचे सुद्धा नातलग नाही, तेव्हा एखाद्या प्रायव्हेट स्क्रीनिंगमध्ये तरी ' गॉडफादर ' आपल्या नजरेला पडण्याचं भाग्य नाही म्हणून तुम्ही झुरता आहात का ? आपण दिल्लीकर नाही, तेव्हा बोऱ्याच वाजणारा का होईना, पण एखादाही फिल्म फेस्टिव्हल आपल्या गावात भरणार नाही आणि पुन्हा आपण आपले ' गॉड फादर 'पासून दूर, या घोर निराशेनं तुम्ही नखं चावत बसला आहात का ? तर मग रसिकहो, तुमचे पडलेले खांदे आणि चेहेरे वर उचलणारी एक आनंदवार्ता तुम्हाला ऐकवायची आहे. सुप्रसिद्ध हिंदी नट–निर्माते–दिग्दर्शक फीरोजखान यांनी आपली अडचण दूर केली. शिवाय त्यांचा ' गॉड फादर ' हा राष्ट्रभाषेत बोलणारा असल्यामुळे तर केवढी मोठ्ठी सोय झाली आहे. कौतुकाची गोष्ट म्हणजे ते आणि देशी ' गॉड फादर 'चे लेखक श्री. कौशल भारती मारिओ पुझोच्या मूळ कथेशी बहुतांश भागात विलक्षण प्रामाणिक राहिले आहेत. कौशल भारतीचं मुळी कौशल्यच हे की, ते मूळ लेखकाशी इमान राखून त्यांच्या कथांच्या देशी आवृत्ती काढतात. आठवा ए. जे. क्रोनिनच्या ' सिटॅडेल 'वर आधारलेला ' तेरे मेरे सपने ' अर्थात ' आधारलेला ' ' घेतलेला ' हे आपल्या सामान्य शब्दकोशातले घासूनघासून गुळगुळीत झालेले शब्द. कारण ' धर्मात्मा– ' (' गॉड फादर 'चं राष्ट्रभाषेतलं नाव) बद्दल जरा आरडाओरड सुरू झाल्यावरच फीरोज खाननं जाहीर तंबी दिली आहे– ' खबरदार आमच्या ' धर्मात्मा 'ला कॉपी वगैरे म्हणाल तर ! मी कबूल करतो, ' गॉड फादर ' हे आमचं स्फूर्तीस्थान होतं. पण आम्ही काही चोरी केलेली नाही. ' भारतीय प्रेक्षक लक्षात ठेवून पुष्कळ बदल करून आम्ही ' धर्मात्मा ' काढला आहे. ' (वि. सू. कृपया अवतरणातला प्रत्येक शब्द शक्तीनुसार जोर देऊन वाचावा.) हां, ' भारतीय प्रेक्षकाच्या आवडीनुसार ' बदल फीरोज–भारती–द्वयानं केलेले आहेत. हातात सदैव राखी घेऊन तयार असलेली बहीण, डोळ्यांत हुकमी अश्रू असलेली आई इ. इ. हुकमी पात्रं त्यांनी आणली आहेत आणि खरं म्हणजे सगळा घोटाळा तिथेच झाला आहे. जोवर मारिओ पुझोच्या कथेबरहुकूम घटना घडत रहातात, तोवर हा सिनेमा निश्चित प्रेक्षणीय आणि हिंदी सिनेमाच्या संदर्भात वेगळा वाटतो; पण मध्येच फीरोझला आणि भारतीला आपलंही कसब दाखवायची हुक्की येते. मग ' हॉर्समेन 'मधली ' बुझकाशी ' ही जीवघेणी अश्वक्रीडा आपल्याला पहायला मिळते. तिचा या कथेशी संबंध काय म्हणून विचारायचं नाही. एकाच तिकिटात ' गॉड फादर ' आणि ' हॉर्स मेन ' हे दोन झकास सिनेमे पहायला मिळाल्याचं समाधान मानलं म्हणजे झाले. एवढा एकच बदल, आपणही कथेवर काही श्रम घेतले आहेत हे दाखवायला कसा पुरेसा पडेल ? मग जाहिराचा विदारक रेप–सीन आला, हेलनचा गरम कॅबेरे आला आणि फरयालची उकळती शृंगारिक दृश्यं आली. बाय द वे या फरयालनं फीरोजचं स्नानाबाबत काय घोडं मारलं आहे कळत नाही. आपल्या दरेक सिनेमात तो टब बाथ घेत असतानाच यमसदनी धाडवतो. आता, थकल्या–भागल्या जिवाला दो घडी विरंगुळा म्हणून सर्वसामान्य प्रेक्षक सिनेमाला येतो आणि फक्त त्याच्यासाठी आम्ही आमचा सिनेमा काढतो, स्वप्नरंजनात्मक आणि पलायनवादी करमणूक त्याला देतो, हा हिंदी सिने–निर्मात्यांचा ठराविक दावा. त्याला अनुसरून उपरोल्लेखित सर्व बदल केले, हे धरून चालू या. त्याबद्दल मुळीच तक्रार नाही. पण गाताबागडता हीरो एकाएकी देशभक्तीचं पडप येऊन जेव्हा पित्याची कमाई ही हरामाची कमाई ऊर्फ काळा पैसा म्हणून पोलिसइन्स्पेक्टरच्या हवाली करतो, तेव्हा थिएटरमध्ये टाळ्यांचा कडकडाट होतो. हा साभिप्राय कडकडाट बाल्कनीवाल्यांचा नसतो. (' बाल्कनीवाले ' ही हल्ली हिंदी सिनेव्यावसायिकांनी वरचा प्रेक्षक आणि समीक्षक यांच्यासाठी शोधून काढलेली शिवी आहे. ) हा कडकडाट अन्नदाते मायबाप ऊर्फ (वेठीला धरला जाणारा) सर्वसामान्य प्रेक्षक करतात आणि तो स्वागताचा नसतो, असं आपलं मला तरी वाटतं आणि मनोजकुमारच्या पावलावर पाऊल टाकायला निघालेल्या फीरोज खानसारख्यानं याची दखल घ्यावी, असंही वाटतं. या शेवटच्या देशभक्तीच्या तकलादू वल्र्त्तीपेक्षा, छान छान कपडे घालून, नायिकेबरोबर गाणी म्हणणारा गुलजार फीरोज हजार हिश्शांनी चांगला वाटतो.

असो. कथेबद्दल जास्त चर्चा नको. कारण आमच्या एका ज्येष्ठ समव्यावसायिकानं ' कथेच्या तपशिलात नाक खुपसण्याचं काही कारण नाही ' अशी आम्हाला एकवार नव्हे तर दो बार जाहीर कानपिचकी दिली आहे. (' आंधी 'च्या निमित्तानं आम्ही केलेल्या उपद्व्यापी अपराधाबद्दल ही सजा आम्हाला वारंवार देण्यात येते.) तर आम्ही त्या ज्येष्ठ सहकाऱ्याच्या प्रेमळ सूचनेला मान देतो. थोडीफार कथा असणाऱ्या दुर्मिळ हिंदी सिनेमांच्या कथेच्या तपशिलात नाक खुपसायला हरकत नाही, मग भले ते नकटं का असेना, असं आपलं आमचं मत. पण आमच्याशिवाय त्याला कोण विचारतो ? आणि त्यातून ' आंधी 'च्या यशापयशाबद्दल चर्चा करायला गुलजारची गुणवत्ता, त्याच्याबद्दलची आस्था हे कारण होतं.

फीरोज खानबद्दल...जाऊ दे. 'आपले बहुसंख्य हिंदी दिग्दर्शक NINCOMPOOPS आहेत ' हे त्याचं मत. असले धाप लावणारे, डिक्शनरीत सहजासहजी न सापडणारे शब्द तो वापरतो, त्या अर्थी त्याचं इंग्रजी हे भयंकर आदरगंड उत्पन्न करण्याच्या दर्जाचं असलं पाहिजे. पण असं मत बेधडकपणे व्यक्त करणाऱ्यानं आपण NINCOMPOOPS का काय ते नसल्याची साक्ष पटवायला पाहिजेच असं नाही. पण...पण नकोच ते. कारण ते कथेच्या तपशिलात नाक खुपसल्यासारखं होईल. दिग्दर्शकाचा आणि कथेचा काहीतरी संबंध असेल, तर तो ' त. ना. खु. ' चा अपराध पुन्हा घडणं नको.

' धर्मात्मा 'तल्या काही गोष्टी आम्हाला मनापासून आवडल्या. कमल बोसनं अफगाणिस्तानच्या वनश्रीवरून कल्पकपणे फिरवलेला कॅमेरा ही त्यांच्यातली मुख्य. ' बुझकाशी 'ही त्यानं छान टिपली आहे. उत्तरार्धात मात्र दिग्दर्शक फिरोज कमल बोसवर फारच अवलंबून राहतो. दर गाण्याच्या वेळी लेन्सचा फिरता वापर, गाड्या लांबच लांब आणि मारामारीच्या वेळी हिरो उंचच उंच दिसावा असले स्पेशल इफेक्टस् अखेर कंटाळवाणे होतात. दिग्दर्शनाचा ताण पडलेल्या फीरोजला आपण अभिनयाच्या बाजूनं सवलत देऊन टाकू या. प्रेमनाथला त्याच्या हल्लीच्या लोकप्रियतेत भर टाकणारी, तऱ्हेवाईकपणाच्या त्याच्या प्रतिमेला साजेशी भूमिका मिळाली आहे आणि मध्यन्तरापर्यंत सिनेमा त्याच्याभोवतीच फिरत राहतो. तेव्हा त्यानं स्वतःला भरपूर गाजवून घेतलं आहे हे सांगणं नकोच. जी गोष्ट प्रेमनाथची, तीच हेमामालिनीची. तिला ' टेलरमेड ' भूमिका मिळाली आहे आणि तिचा तिनं चांगला फायदा उठवला आहे. अवखळ, उसळती इ. इ. जिप्सी छोकरी म्हणून ती शोभून दिसते—बऱ्याच दिवसांनी चांगली दिसते. तिच्यावर चित्रित केलेलं ' मेरे गलियोंसे लोगोंकी यारी बढ गयी ' हे गाणं लताच्या गायनशैलीमुळे बरं वाटतं. एरवी या सिनेमात कल्याणजी—आनंदजींपेक्षा त्यांच्या धाकट्या भावाला—न्हिदम किंग बाबलाच जास्त काम पडलं आहे.

कादंबरीतली केची तेजस्वी व्यक्तिरेखा रेखाच्या गळचात बांधण्यासारखा मारिओ पुझोचा आणि केचा अपमान नसेल. एरवी रेखाचं काम फक्त ग्लॅमरस दिसण्याचं. ' धर्मात्मा 'नं बिचारीला तोही वाव दिलेला नाही. तिच्यापेक्षा अगदीच मामुली काम मिळालेली फरीदा जलालदेखील लक्षात राहते. पण ती व्यक्तिरेखा म्हणून नव्हे, तर मिस्किलपणामुळे नेहमीच गोड वाटणारी फरीदा जलाल म्हणून. जीवन, रणजीत, सुधीर आणि मंडळी आपलं घृणा आणण्याचं काम इमानेइतबारे बजावून जातात. ■ ■

---

## प्रकाश इनामदार : पृष्ठ २५ वरून

पाहत आहे. तो त्याला निश्चित मिळेल यात संशय नाही.

### चित्रपटक्षेत्रात प्रवेश

ए. व्ही. आपटे यांच्या ' नसती उठाठेव 'मध्ये प्रकाशनं साहाय्यक भूमिका केली आहे. त्याची कीर्ति ऐकून रवीन्द्र नाट्यमंदिरवर एक दिवस अचानक आपटे आणि प्रसिद्ध सिनेदिग्दर्शक दत्ता धर्माधिकारी आले आणि करार पक्का करूनच गेले. काम दुय्यम असूनही नायकापेक्षा तोच भाव मारून गेला आहे. राजा परांजप्यांचं चांगलं मार्गदर्शन यावेळी त्याला लाभलं. तो चित्रपट सपशेल पडला.

' कटयार 'च्या भूमिकेवर बेहद्द खूष असलेल्या हृषीकेश मुकर्जी, सुलोचनाबाई, लन्हैयालाल, धुमाळ इ. अनेकजणांनी त्याला चित्रपटात काम मिळवून देण्याविषयी आश्वासन दिलेलं आहे. हिंदी चित्रपटसृष्टीत प्रकाश थोड्या दिवसातच प्रवेश करून असरानी पेंटल यांच्याप्रमाणे आपलं स्थान निश्चित करणार आहे हे सांगायला आता भविष्यकाराची जरुरी नाही. पण त्यासाठी कोणाच्या मागे लागण्याचा त्याचा स्वभाव नाही, सध्या तेवढा वेळही नाही.


पुढेमागे नाटक आणि चित्रपटाच्या दिग्दर्शनाची संधि मिळावी अशी प्रकाशची मनस्वी इच्छा आहे. कलाकारांच्या चलतीचा चलतीचा काळ थोडा असतो. त्यामुळे अवसर मिळताच चित्रपटाच्या तांत्रिक बाजूंचाही अभ्यास करण्याचा त्याचा मनोदय आहे. योग्य वेळी त्याचा उपयोग होईल. वयाच्या अवघ्या पंचविसाव्या वर्षी मिळणाऱ्या नावलौकिकामुळे हवेत न वावरता अशी दूरदृष्टी ठेवणाऱ्या प्रकाशचा भविष्यकाळ उज्ज्वल आहे यात शंका नाही. आजच्या यशाच्या पाठीशी अप्पासाहेब इनामदार, शंकर घाणेकर, पुरुषोत्तम दारव्हेकर, विजया मेहता आणि राजा परांजपे यांनी करून घेतलेली मेहनत आणि आशीर्वाद आहेत असं प्रकाश विनम्रपणे मान्य करतो.

त्याची नूतन पत्नी सौ. नयन हीसुद्धा कलाकार आहे. दोघं मिळून ' कलासंगम 'च्या बॅनरखाली काहीतरी नवीन सादर करण्याच्या विचारात आहेत. नोकरी करून नाट्यव्यवसाय सांभाळणाऱ्या इतर काही कलाकारांप्रमाणे आपणही नोकरी करावी असा विचार त्यांच्या मनात अधूनमधून येतो. परंतु दरमहा कमीतकमी १५ प्रयोगात काम करणाऱ्या प्रकाशला पुढील १५ वर्षांत नोकरी मिळण्याचा संभव दिसत नाही. ■ ■

# प्रकाश इनामदार



◀ बेलभंडार



देवाजीने करुणा केली ▼



आतुन कीर्तन वरुन तमाशा ▼






कट्यार काळजात घुसली



# यारी हो गयी यारसे .... म्हणून तर ही अदा !

'गुरू प्रीत' प्रॉडक्शनच्या
'यारी हो गयी यारसे' मध्ये सिंपल कपाडिया
थोरल्या बहिणीप्रमाणेच ही चित्रसृष्टीत वादळ निर्माण करू शकेल काय ?
– छाया : दीप पाल

# आगामी




O ही त्रिमूर्ती चिंतेत चूर.......

असरानी, विजू खोटे आणि संजीवकुमार खरोखर 'उलझन' मध्ये पडलेले दिसतात.

O तर ही त्रिमूर्ती उदरभरणात ! (जेवण, निर्मात्याकडून असलं की अधिक गोड लागतं का ?......)

महमूद विनोदखन्ना, आणि रणजीत कामाच्या धाईगर्दीतून लंच ब्रेकमध्ये थोडी मौजमजा करताना.



MANOOS ( Weekly ) : 100 Paise : Regd. No. PNC-68





## एक जले दिपक - एक मन मेरा!....

रीना रॉयची विरहिणी मुद्रा
जय फिल्मसच्या 'अजब तेरी सरकार' मध्ये
दिग्दर्शक - राजेन्द्र भाटीया

## 'जोतिबाचा नवस' मध्ये

ऐन नव्हाळीतल्या पद्माचं
एक सुभग दर्शन.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर